# ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या २२७ कोटींच्या मालमत्तेवर टाच

दैनिक
समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ७ वे अंक –३० गुरूवार दि.०८ ऑक्टोबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-7th Issue- 30 Thursday, Dt.08 October 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# महाराष्ट्राच्या दुष्काळी परिस्थितीबाबत मुख्यमंत्र्यांकडून अमित शाह यांना माहिती

## केंद्र सरकारकडून विशेष मदतीची मागणी; केंद्रीय पथकाकडून आठ ऑक्टोबरपासून महाराष्ट्राची पाहणी

नवी दिल्ली : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन दिवसीय दिल्ली दौऱ्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीत मुख्यमंत्र्यांनी शाह यांना महाराष्ट्रातील गंभीर दुष्काळी परिस्थितीची आणि राज्य सरकार याबाबत करत असलेल्या उपाययोजनाची माहिती देऊन केंद्र सरकारकडून विशेष मदतीची मागणी केली. यासोबतच मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्याशी नागपूर विमानतळाच्या विस्तारीकरणासंदर्भात महत्वपूर्ण चर्चा केली. या चर्चेमुळे नागपूर विमानतळासाठी आवश्यक असणारी संरक्षण विभागाची २७ एकर जागा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय गृहमंत्री शाह यांच्यासोबत झालेल्या भेटीत राज्य सरकारने केंद्राकडे पाठविलेल्या आगाऊ प्रस्तावाची प्रतही दिली. राज्यातील सुमारे ३२ जिल्ह्यांमध्ये दुष्काळाची गंभीर परिस्थिती असून जवळपास ८० टक्के तालुके दुष्काळाने बाधित असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. दुष्काळाच्या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान महाराष्ट्रातील विविध भागांचा दौरा करणार आहे. या पथकाकडून प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर केला जाणार असून, राज्याने पाठविलेला प्रस्ताव आणि पथकाचा अहवाल यांच्या आधारे राष्ट्रीय

पान २ वर..



### नागपूर विमानतळाच्या नव्या टर्मिनलसाठी जागेचा अडथळा दूर

### एमपीएससी आंदोलनाबाबत सरकारची भूमिका विद्यार्थीहिताची

एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत प्रतिक्रिया देतांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने मांडलेल्या पाचही मागण्यांवर राज्य सरकारने सकारात्मक भूमिका घेतली असून, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांवरील चौकशीसंदर्भात न्यायालयीन चौकशी करण्यास सरकारने तयारी दर्शविली आहे. चौकशीत गैरप्रकार किंवा गैरवर्तन आढळल्यास संविधानातील कलम ३१७ नुसार पुढील कार्यवाही करण्याची भूमिकाही सरकारने स्पष्ट केली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षामध्ये पारदर्शकता वाढविण्यासाठी व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून, विद्यार्थ्यांसह प्राध्यापक, माजी विद्यार्थी आणि अन्य संबंधित घटकांशी संवाद साधून सुधारणा सुचविण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, विद्यार्थ्यांच्या प्रश्नाऐवजी आंदोलनाचा राजकीय वापर केला जात असल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली. राज्यातील पोलिसांनी आंदोलनादरम्यान अत्यंत संयमाने परिस्थिती हाताळली असून, विद्यार्थ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या २२७ कोटींच्या मालमत्तेवर शासनाची टाच

## नऊ प्रकल्प जप्त

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

बीड: ठेवीदारांचे पैसे परत करण्यात अपयशी ठरल्याने राज्य शासनाने बीड येथील ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीवर मोठी धडक कारवाई केली आहे. राज्यपालांच्या आदेशानुसार राज्याच्या प्रधान सचिवांनी १ ऑक्टोबर रोजी ज्ञानराधाच्या तब्बल २२७ कोटी ४८ लाख रुपयांच्या नऊ मालमत्ता जप्त करण्याचे आदेश दिले आहेत.

या मोठ्या कारवाईत बीडमधील सात, तर छत्रपती संभाजीनगरमधील सय्यदपूर आणि सातारा जिल्ह्यातील फलटण येथील प्रत्येकी एका मालमत्तेचा समावेश आहे. यामध्ये तिरूमला समूहाच्या विविध ऑइल मिल, जिनिंग, रिफायनरी आणि डेअरी प्रकल्पांच्या मशिनरी व साहित्यावर जप्ती आणण्यात आली आहे. मुदत संपल्यानंतरही ठेवीदारांना त्यांचे पैसे आणि व्याज परत न केल्याने संस्थेच्या अध्यक्ष, संचालक आणि

पान २ वर..




# वीरशैव लिंगायत शिवाचार्य महासभा महाराष्ट्राच्या अध्यक्षपदी तपोरत्न नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज सोनपेठकर यांची निवड

## कपिलधार येथे महाराष्ट्रातील शिवाचार्यांची बैठक, नूतन कार्यकारिणीची एकमताने निवड



बीड ।प्रतिनिधी

श्री क्षेत्र मन्मथ स्वामी देवस्थान, कपिलधार-मांजरसुंबा येथे बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी महाराष्ट्रातील शिवाचार्यांची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात संपन्न झाली. अखिल भारतीय वीरशैव शिवाचार्य संस्थेचे उपाध्यक्ष श्री ष ब्र. डॉ. १०८ श्रीकंठ शिवाचार्य महाराज, नागणसूर (सोलापूर) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत वीरशैव लिंगायत शिवाचार्य महासभा महाराष्ट्र या संस्थेच्या नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

या बैठकीत श्री ष ब्र. १०८ तपोरत्न नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज सोनपेठकर यांची वीरशैव लिंगायत शिवाचार्य महासभा महाराष्ट्रच्या राज्य अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. तसेच कार्याध्यक्षपदी शिवाचार्य रत्न श्री ष ब्र. १०८ डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज उदगीरकर, उपाध्यक्षपदी श्री ष ब्र. १०८ गुरुपादेश्वर शिवाचार्य महाराज गिरगावकर, तर सचिवपदी श्री ष ब्र.

पान २ वर..



# माहिती अधिकारी यासिरुद्दीन काझी यांच्याकडे जिल्हा माहिती अधिकारी पदाचा प्रभारी पदभार

### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने पुढील कार्यासाठी शुभेच्छा..!

बीड ।प्रतिनिधी

बीडचे माहिती अधिकारी यासिरुद्दीन काझी यांच्याकडे जिल्हा माहिती अधिकारी बीडचा प्रभारी पदभार देण्यात आला आहे.याबद्दल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने त्यांना शाल, गुलाबाचे झाड भेट देऊन सत्कार करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, मराठवाडा विभागीय महिला अध्यक्ष शेख आयेशा यांच्यासह बीड जिल्हा उपाध्यक्ष रईस खान, उपाध्यक्ष शेख आयुब, जिल्हा सहसचिव अमोल शिंदे,दिव्य आधारचे संपादक शेख रिजवान, दैनिक किसानचे कार्यकारी संपादक अदनान खानसह पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# दुष्काळात शेतकऱ्यांना दिलासा

## बाजीराव दादा चव्हाण यांच्या पुढाकारातून इमामपूरमध्ये चारा वाटप

### विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे यांच्या हस्ते चारा वाटप

बीड ।प्रतिनिधी

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आणि पशुपालकांसमोर निर्माण झालेल्या जनावरांच्या चाऱ्याच्या प्रश्नावर दिलासा देण्यासाठी इमामपूर येथे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी चारा वाटप करण्यात येणार आहे. युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे साहेब आणि युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या वतीने इमामपूर येथे हा चारा वाटपाचा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे यांच्या हस्ते दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना जनावरांसाठी चारा वाटप करण्यात येणार आहे.

दुष्काळामुळे शेतीच्या उत्पन्नावर परिणाम होत असतानाच पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध करून देण्याचे मोठे आव्हान शेतकऱ्यांसमोर निर्माण झाले आहे. पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना आपल्या जनावरांच्या चाऱ्यासाठी मोठी आर्थिक कसरत करावी लागत आहे. या पार्श्वभूमीवर चारा वाटपाचा हा उपक्रम पशुपालक शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

बाजीराव दादा चव्हाण यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमातून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या पशुधनासाठी आवश्यक चारा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यास मदत होणार. दुष्काळाच्या संकटात शेतकरी आणि पशुधनाला आधार देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या चारा वाटप कार्यक्रमाकडे परिसरातील शेतकरी व पशुपालकांचे लक्ष लागले आहे. कार्यक्रमाच्या



माध्यमातून दुष्काळग्रस्त भागातील पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न काही प्रमाणात कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

या उपक्रमामुळे दुष्काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी आणि पशुधनाच्या आधारासाठी बाजीराव दादा चव्हाण असा संदेश देण्यात येत असून, इमामपूर परिसरातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना चारा वाटपाचा प्रत्यक्ष लाभ मिळणार आहे.



### पत्रकार अदनान खान यांच्या वाढदिवसानिमित्त पत्रकार संघातर्फे शुभेच्छा..!

बीड ।प्रतिनिधी

सायं दैनिक किसानचे कार्यकारी संपादक अदनान खान यांचा नुकताच वाढदिवस संपन्न झाला. या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने त्यांना शाल पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. बीडचे प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी यासिरुद्दीन काझी यांनी देखील अदनान खान यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, मराठवाडा विभागीय महिला अध्यक्ष शेख आयेशा यांच्यासह बीड जिल्हा उपाध्यक्ष रईस खान, उपाध्यक्ष शेख आयुब, जिल्हा सहसचिव अमोल शिंदे,दिव्य आधारचे संपादक शेख रिजवान सह पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

## संपादकीय....

# आचारसंहिता कागदावर नको, कृतीत दिसली पाहिजे..!

निवडणूक लोकशाहीचा उत्सव पैसा, प्रलोभन, जात-धर्माचे राजकारण आणि सत्तेच्या गैरवापराला थारा नको महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू होताच आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक आयोगाने उमेदवार, राजकीय पक्ष, कार्यकर्ते आणि प्रशासनासाठी स्पष्ट मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. या सूचनांचा खरा उद्देश केवळ नियमांची यादी तयार करणे नसून निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भय, निष्पक्ष आणि शांततापूर्ण ठेवणे हा आहे. त्यामुळे आचारसंहिता ही निवडणूक काळापुरती औपचारिकता न राहता लोकशाहीच्या शुचितेची कसोटी ठरली पाहिजे.

निवडणूक प्रचार करताना विरोधकांच्या धोरणांवर, कार्यक्रमांवर आणि सार्वजनिक कामगिरीवर टीका करण्याचा अधिकार प्रत्येक राजकीय पक्षाला आहे. मात्र वैयक्तिक आयुष्यावरील चिखलफेक, खोटे आरोप, अफवा आणि विपर्यस्त माहितीचा आधार घेऊन मतदारांची दिशाभूल करणे हा लोकशाहीचा अपमान आहे. राजकीय मतभेद असावेत परंतु ते वैयक्तिक वैरात रूपांतरित होता कामा नयेत.

विशेषतः जात, धर्म, भाषा आणि समाजघटकांच्या भावनांना हात घालून मतांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न थांबला पाहिजे. देवळे, मशिदी, चर्च, गुरुद्वारे किंवा अन्य धार्मिक स्थळांचा निवडणूक प्रचारासाठी वापर करण्यास स्पष्ट मनाई आहे. तरीही निवडणुकीच्या रणधुमाळीत भावनिक मुद्द्यांना खतपाणी घालण्याचा मोह राजकीय पक्षांनी टाळला पाहिजे. कारण निवडणूक जिंकणे महत्त्वाचे असले तरी समाजाचे ऐक्य टिकवणे त्याहून महत्त्वाचे आहे.

आचारसंहितेचा सर्वात गंभीर भाग म्हणजे पैशांचे आमिष, दारूचे वाटप, मतदारांवर दबाव, धमकी किंवा मतदानाच्या प्रक्रियेत गैरप्रकार. मत हा विक्रीचा माल नाही. तो लोकशाहीतील नागरिकाच्या विवेकाचा अधिकार आहे. त्यामुळे मतदाराला प्रलोभन दाखवून मिळवलेला विजय हा प्रत्यक्षात लोकशाहीचा पराभवच असतो.

सत्ताधाऱ्यांसाठी आचारसंहिता ही अधिक कठोर नैतिक परीक्षा आहे. सरकारी यंत्रणा, शासकीय निधी, सरकारी जाहिराती किंवा विकासकामांचा राजकीय प्रचारासाठी वापर होऊ नये. शासनाची कामे आणि निवडणूक प्रचार यांची सरमिसळ झाली तर समान संधीच्या तत्त्वालाच धक्का बसतो. निवडणूक आयोगाच्या नियमांचे पालन सत्ताधारी असो वा विरोधक सर्वांसाठी समान असले पाहिजे.सभांसाठी मैदान, हेलिपॅड, ध्वनिवर्धक यांचा वापर करताना आवश्यक परवानग्या घेणे, मिरवणुकांचे मार्ग व वेळ निश्चित करणे, वाहतुकीला अडथळा न आणणे आणि पोलिस प्रशासनाला सहकार्य करणे ही प्रत्येक उमेदवाराची जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे इतर पक्षांच्या सभा-मिरवणुकांना अडथळा आणणे, भित्तीपत्रके फाडणे, सार्वजनिक किंवा खासगी मालमत्तेचे विद्रुपीकरण करणे हे राजकीय संस्कृतीला काळिमा फासणारे प्रकार आहेत.मतदानाच्या दिवशी तर अधिकच संयमाची गरज आहे. मतदान केंद्राच्या परिसरात प्रचार, चिन्हांचे प्रदर्शन किंवा मतदारांना प्रभावित करण्याचा प्रयत्न होऊ नये. निवडणूक अधिकारी, कर्मचारी आणि पोलिस प्रशासनाला मुक्तपणे काम करता आले पाहिजे.

पान १ वरून..

**महाराष्ट्राच्या दुष्काळी...**

आपत्ती प्रतिसाद निधीअंतर्गत मदतीबाबत निर्णय होणार आहे. केंद्राकडून महाराष्ट्राला जास्तीत जास्त मदत देण्यात येईल,असे सांगून केंद्रीय मंत्री शाह यांनी केंद्र सरकार भक्कमपणे महाराष्ट्राच्या पाठीशी उभे राहील, असे आश्वस्त केल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याशी झालेल्या चर्चेचा संदर्भ देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, उपग्रह प्रतिमांच्या निकषांबरोबरच पावसातील खंड, भूजल पातळी, पिकांचे नुकसान आणि प्रत्यक्ष पाहणी यांसारख्या अन्य निकषांचाही विचार केला जाणार आहे. काही तालुके उपग्रह प्रतिमांच्या निकषात बसत नसले तरी इतर निकषांवर पात्र ठरत असल्यास त्यांचाही विचार केला जाईल. सुमारे २० तालुक्यांमध्येही पिकांच्या नुकसानीच्या आधारे दुष्काळी मदत देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्याच्या निधीतून शेतकऱ्यांना तातडीने मदत

केंद्राकडून मदत मिळण्यास वेळ लागू शकतो, त्यामुळे राज्य सरकार आपल्या उपलब्ध संसाधनांतून शेतकऱ्यांना प्रथम मदत करण्याच्या तयारीत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. सुमारे २३ हजार गावांमध्ये काही पिकांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून उर्वरित सर्वेक्षणाची कार्यवाहीही वेगाने सुरू आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण करून शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत देण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

नागपूर विमानतळासाठी २७ एकर जागा हस्तांतराचा मार्ग मोकळा

मुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचीही भेट घेतली. नागपूर विमानतळाच्या नव्या टर्मिनल इमारतीसाठी आवश्यक असलेल्या २७ एकर जागेचा प्रश्न या बैठकीत चर्चिला गेला. ही जागा सध्या भारतीय वायुदलाच्या ताब्यात आहे. नवीन टर्मिनलच्या कामासाठी आवश्यक जागा तातडीने हस्तांतरित करण्यास वायुदलाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. उर्वरित भागासाठी आवश्यक बांधकाम पूर्ण करून तो भागही पुढे हस्तांतरित करण्यात येणार आहे. या बैठकीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे दूरदृश्य संवादप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

बांधकामासाठी आवश्यक अवजड यंत्रसामग्रीच्या हालचालीसाठी वायुदलाच्या परिसरातील हेलिकॉप्टर पार्किंग व अन्य कार्यवाहीच्या अनुषंगाने आवश्यक परवानग्या देण्यासही संरक्षण मंत्रालयाने सहमती दर्शविली असून, त्यासाठी आवश्यक 'एसओपी' तयार करण्यात येणार आहे. यामुळे नागपूर विमानतळाच्या टर्मिनल प्रकल्पासाठी असलेले अडथळे दूर झाल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

पान १ वरून..

**ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या...**

व्यवस्थापकांवर वैजापूरसह इतर ११० पोलीस ठाण्यांत फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ठेवीदारांचे हित जपण्यासाठी शासनाने हे कठोर पाऊल उचलले असून, या जप्त केलेल्या सर्व मालमत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी बीडच्या उपजिल्हाधिकाऱ्यांची प्राधिकारी म्हणून विशेष नियुक्ती करण्यात आली आहे. या कारवाईमुळे फसवणूक झालेल्या हजारो सामान्य ठेवीदारांना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे..

**वीरशैव लिंगायत शिवाचार्य ....**

१०८ डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर यांची निवड करण्यात आली.

त्याचबरोबर कोषाध्यक्षपदी श्री ष ब्र. १०८ महादेव शिवाचार्य वाईकर महाराज, प्रवक्तेपदी श्री ष ब्र. १०८ अमृतेश्वर शिवाचार्य महाराज जिंतूरकर तसेच श्री ष ब्र. १०८ दिगंबर शिवाचार्य महाराज वसमतकर यांची कार्यकारिणीत नियुक्ती करण्यात आली.

श्री क्षेत्र कपिलधार येथील पवित्र वातावरणात महाराष्ट्रातील शिवाचार्यांच्या उपस्थितीत नूतन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. वीरशैव-लिंगायत समाजातील धार्मिक, आध्यात्मिक व सामाजिक कार्याला अधिक व्यापक स्वरूप देणे, शिवाचार्यांच्या माध्यमातून समाजामध्ये धार्मिक व सांस्कृतिक प्रबोधन वाढविणे तसेच समाजाच्या विविध प्रश्नांवर संघटितपणे कार्य करणे, या दृष्टीने नूतन कार्यकारिणी महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल महाराष्ट्रातील शिवाचार्य, भक्तगण आणि वीरशैव-लिंगायत समाजबांधवांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, नूतन कार्यकारिणीच्या माध्यमातून महासभेचे कार्य अधिक गतिमान होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री . रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७६५/२०२६**
**हेमलता भ्र.गंगाधर शेजाळे व इतर वि.शासन निरंक**
**(मार्फत - अ‍ॅड. आर. ए. कोळेकर)**

ज्याअर्थी मयत नामे गंगाधर संतराम शेजाळे, रा. मिरकाळा, ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक १९/०५/२०२६ रोजी रुबी मेडीकल सेंट मुंबई येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ हेमलता भ्र. गंगाधर शेजाळे, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. मिरकाळा ता. गेवराई जि.बीड ह.मु. हरीयाली गाव, टोगोरे, नगर, संतोषीमाता मंदीराजवळ, विखरोळी पुर्व मुंबई ४०००८३, अर्जदार क्र. २ अकाश गंगाधर शेजाळे, वय ३२ वर्षे, धंदा मजुरी, रा. मिरकाळा ता. गेवराई जि.बीड ह.मु. हरीयाली गाव, टोगोरे, नगर, संतोषीमाता' मंदीराजवळ, विखरोळी पुर्व मुंबई ४०००८३, अर्जदार क्र. ३ सुरज गंगाधर शेजाळे, वय २८ वर्षे, धंदा मजुरी रा. मिरकाळा ता. गेवराई जि.बीड ह.मु. हरीयाली गाव, टोगोरे, नगर, संतोषीमाता मंदीराजवळ, विखरोळी पुर्व मुंबई ४०००८३ यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत गंगाधर संतराम शेजाळे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०३/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - १७/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७९०/२०२६**
**निलावती भ्र. विलास येवले व इतर वि. निरंक**
**मार्फत अ‍ॅड ए. बी. जोशी, गेवराई)**

अर्जदार

१. निलावती भ्र. विलास येवले वय ६५ वर्षे, धंदा घरकाम रा. रूई ता. गेवराई जि. बीड

२. कमलबाई भ्र. भास्कर पानखडे वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. राजपिंपरी ता. गेवराई जि. बीड

३. मिरा भ्र. पंडीत जाधव वय ४६ वर्षे, धंदा - शेती, रा. ठाकरआडगाव ता. गेवराई जि. बीड

ज्याअर्थी मयत चतुराबाई भ्र. अंकुश कोकाट हे/हया अनुक्रमे दिनांक ०५/०४/२०२१ रोजी मौजे ठाकरआडगाव ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत चतुराबाई भ्र. अंकुश कोकाट, रा. ठाकरभडगाव ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९/०९/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

पुढील तारीखः- १७/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**जाहीर प्रगटन**
**मा. श्री. आर. ए. मिसाळ, न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कोर्ट नं.१ गेवराई यांच्या न्यायालयात**
**किरकोळ फौजदारी अर्ज ३९३/२०२६**
**बालाजी वि. ग्रामसेवक**
**अर्जदार :- बालाजी बबनराव शिंदे,**
**वय - ४० वर्षे, धंदा- शेती, रा. सेलु,**
**ता. गेवराई जि. बीड**
**विरुध्द**
**गैरअर्जदार ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सेलु, ता. गेवराई जि. बीड**
**मागणी अर्जः- रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अ‍ॅण्ड डेथ अ‍ॅक्ट १९६९ अन्वये जन्माची नोंद घेण्याबाबत..**

वरील अर्जदार नामे बालाजी बबनराव शिंदे, यांनी या न्यायालयात अर्जदाराची मुलगी नामे श्रेया बालाजी शिंदे हिच्या जन्माची नोंद जन्म मृत्यु रजिस्टर, ग्रामपंचायत कार्यालय सेलु, ता. गेवराई जि. बीड च्या जन्म मृत्यु रजिस्टरला घेण्याबाबत व जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी श्रेया बालाजी शिंदे, हिचा जन्म दिनांक ०९.०७.२०११ रोजी मौजे सेलु,, ता. गेवराई जि. बीड येथे झाला असुन त्यांचे जन्म प्रमाणपत्राची शासकीय, निमशासकीय व इतर कार्यालयीन कामकरीता आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदाराची मुलगी नामे श्रेया बालाजी शिंदे यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय सेलु, ता. गेवराई जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु श्रेया बालाजी शिंदे यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय सेलु, ता. गेवराई जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९ माहे सप्टेंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी

प्रकरणाची पुढील तारीख १५ ऑक्टोबर, २०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

आदेशावरुन,
सहाय्यक अधिक्षक
फौजदारी विभाग,
गेवराई कोर्ट क्र.१

**जाहिर घोषणा**
**मा. श्री. एच. एम. मोमीन, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. २, गेवराई, जि. बीड याच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ३९८/२०२६**
**शेख हुजैफ शेख अब्बास वि मुख्याधिकारी न. प. गेवराई**
**(मार्फत अ‍ॅड एए शेख)**

ज्याअर्थी अर्जदार नामे शेख हुजैफ शेख अब्बास, वय १९ वर्ष रा. कोरबु गल्ली, ता. गेवराई जि बीड यानी गैरअर्जदार मुख्याधिकारी न. प. कार्यालय गेवराई ता. गेवराई, जि. बीड यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार स्वतः नामे शेख हुजैफ शेख अब्बास रा. कोरबु गल्ली ता. दिनांक ११/०४/२००७ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनाकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०७/१०/२०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २६/१०/२०२६.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

आदेशावरुन,
सहाय्यक अधिक्षक
फौजदारी विभाग,
गेवराई कोर्ट क्र.१

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७८०/२०२६**
**सीताबाई ब्र. जनार्दन गलधर आणि इतर वि. निरंक**
**मार्फत अ‍ॅड पी. पी. जरांगे, गेवराई)**

अर्जदार

१. सीताबाई ब्र. जनार्दन गलधर

वय ७४ वर्षे, धंदा घरकाम, रा. घुमेगांव आडपिंपरी, ता. गेवराई जि. बीड २. केशव पि. जनार्धन गलधर वय ४६ वर्षे, धंदा- शेती, रा. धुमेगांव आडपिंपरी, ता. गेवराई जि. बीड ३. विठ्ठल पि. जनार्धन गलधर वय ३९ वर्षे, धंदा - शेती, रा. धुमेगांव आडपिंपरी, ता. गेवराई जि. बीड ४. सुरेखा ब्र. सुरेश काजले, वय ४१, व्यवसाय गृहिणी, रा. बडगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर

ज्याअर्थी मयत जनार्धन पि. सर्जेराव गलधर हे/हया अनुक्रमे दिनांक २३/०९/२०२० रोजी मौजे धुमेगांव आडपिंपरी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत जनार्धन पि. सर्जेराव गलधर, रा. धुमेगांव आडपिंपरी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २८/०९/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीखः- १६/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६८६/२०२६**
**(शामल भ्र.बाबुराव नागरगोजे आणि इतर वि. निरंक)**
**मार्फत आणि एस. के. कारके, गेवराई**

अर्जदार

१. शामल भ्र. बाबुराव नागरगोजे वय ६० वर्षे, धंदा घरकाम रा. भगवान नगर गेवराई ता. गेवराई जि. बीड

२. राहुल पि. बाबु नागरगोजे वय ४१ वर्षे, थंबा - शेती २. भगवान नगर गेवराई ता. गेवराई जि. बीड

३. संदेश पि. बाबुराव नागरगोजे वय ३६ वर्षे, धंदा - शेती रा. भगवान नगर गेवराई ता. गेवराई जि. बीड

ज्याअर्थी मयत बाबुराव मुक्ताजी नागरगोजे हे/हया अनुक्रमे दिनांक १७/०७/२०२६ रोजी मौजे गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहत अर्जदार यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरह मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुटतीन कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा धवन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत बाबुराव मुक्ताजी नागरगोजे, रा. भगवान नगर गेवराई ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३१/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०९/१०/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# रानडुकराच्या हल्ल्यात शेतकरी गंभीर जखमी

सेनगाव / प्रतिनिधी

सेनगाव तालुक्यातील शिवणी बुद्रुक येथे शेतात पिकांना पाणी देत असताना एका शेतकऱ्यावर रानडुकराने हल्ला केल्याची घटना रविवारी दि.४ रोजी रात्रीच्या सुमारास घडली आहे. या हल्ल्यात संदीप भिवाजी कुटे (वय ३५) हे शेतकरी गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर हिंगोली येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार असल्याची माहिती डॉ गणेशराव पाचपिल्ले यांनी दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री अंदाजे १:३० वाजण्याच्या सुमारास संदीप कुटे हे शेतात गट क्र.२३० मध्ये हळदीला पाणी देत असताना रानडुकराने त्यांच्यावर अचानक हल्ला केला.त्यानी आरडाओरड केल्यानतर रानडुक्कराने घटनास्थळावरुन पळ काढला



घटनेनंतर डॉ. गणेशराव पाचपिल्ले व ग्रामस्थांनी तत्काळ त्यांना सेनगाव रुग्णालयात दाखल केले मात्र त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी त्यांना हिंगोली येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.या घटनेमुळे शिवणी बुद्रुक आणि परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वनविभागाने वन्यप्राण्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी

# गेवराई शहराच्या वैभवात भर; रय्यान फंक्शन हॉलचे ९ ऑक्टोबर रोजी भव्य उद्घाटन

गेवराई (प्रतिनिधी):- गेवराई शहरातील तय्यब नगर येथे नव्याने साकारण्यात आलेल्या रय्यान फंक्शन हॉलचा भव्य उद्घाटन सोहळा शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या फंक्शन हॉलचे उद्घाटन मुफ्ती मोईनोद्दीन साहेब यांच्या हस्ते होणार आहे.

या उद्घाटन सोहळ्यास गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह राजे पंडित, माजी आमदार अमरसिंह पंडित, मा.मंत्री बदामराव पंडित साहेब,माजी आमदार लक्ष्मण अण्णा पवार, नगराध्यक्ष गीता भाभी पवार तसेच युवा नेते बाळराजे दादा पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

गेवराई शहराच्या वैभवात भर घालणारा हा भव्य मुस्लिम शादीखाना असून, नागरिकांसाठी लग्न समारंभ तसेच विविध कौटुंबिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी प्रशस्त आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या




आहेत.

रय्यान फंक्शन हॉलमध्ये प्रशस्त ओपन स्पेस, आकर्षक स्टेज, सुंदर गार्डन यासह विविध आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत. नागरिकांना परवडणाऱ्या दरात भव्य आणि दर्जेदार सोहळे आयोजित करता यावेत, या उद्देशाने या फंक्शन हॉलची उभारणी करण्यात आली आहे.तसेच रय्यान फंक्शन हॉल ची बुकींग सुरु झाली आहे.बुकींग करण्यासाठी मोबाईल नं.

९८२२७७२९५३,९७७९२९२५७,९४२११२६६६६ वर संपर्क करावे

# बलभीम महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

बीड (प्रतिनिधी)

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष तथा बलभीम महाविद्यालय विकास समिती प्रमुख मा.अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनात पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग आणि संशोधन केंद्राच्या वतीने दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी 'बलभीम करंडक राज्यस्तरीय वक्तृत्व' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी जेन झी च्या अंतरंगात, सर्व अनर्थ एका अविद्येने केले...,आरक्षण: वास्तव आणि विपर्यास, भेसळीच्या विषा:तुकारामाच्या देशा, महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह: समतेचा संगर हे विषय ठेवण्यात आलेले आहे. या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे हे चौथे वर्ष असून या स्पर्धेत प्रथम पारितोषिक दहा हजार रूपये,स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक सात हजार रूपये,स्मृतिचिन्ह व



प्रमाणपत्र, तृतीय पारितोषिक पाच हजार रूपये, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, दोन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी एक हजार रूपये व प्रमाणपत्र ठेवण्यात आले आहे. सदरील राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत महाराष्ट्रातील नामवंत महाविद्यालयातील संघ सहभागी होणार असून बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त संघांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन प्राचार्य प्रो. डॉ.संतोष उंदरे, उपप्राचार्य प्रो.डॉ.बाबासाहेब कोकाटे, प्रबंधक पी.पी.डावकर, मराठी विभागप्रमुख प्रो.डॉ. मनोहर सिरसाट व संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# फावडेवाडीकर जिओच्या सेवेने महिनाभरापासून त्रस्त

## जिओ टॉवर गावातच पण रेंजच नसल्याने ग्रामस्थांचा संताप अनावर

माजी सरपंच संजय केंद्रे यांचा तीव्र आंदोलनाचा इशारा

अंबाजोगाई / सुनील सीरसाट

पानगाव सारख्या एक शहराप्रमाणे विकसित असणाऱ्या मोठ्या लोकसंख्येच्या गावाच्या अगदी लगत असणाऱ्या फावडेवाडी येथील गावात जिओचे टावर असून सुद्धा गेल्या महिन्याभरापासून जिओच्या अत्यंत ढसाळ सेवेमुळे फावडेवाडी गावचे ग्रामस्थ प्रचंड संतापले आहेत.

एकेकाळी संपूर्ण गावाने एकमुखाने जिओची सेवा स्वीकारली. आणि अलीकडे आता वारंवार नेटवर्क गायब होत असल्याने ग्रामस्थ कमालीचे त्रस्त व टोकाचे संतप्त झाले आहेत.

फावडेवाडी गावातील रिलायन्स जिओची मोबाईल व इंटरनेट सेवा मागील वीस ते पंचवीस दिवसांपासून सातत्याने विस्कळीत होत असून नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे



जावे लागत आहे. आज सकाळपासून तर गावात जिओचे नेटवर्क पूर्णपणे ठप्प झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

फावडेवाडी हे गाव लातूर-बीड जिल्ह्याच्या बॉर्डीवरती असून गावाची लोकसंख्या सुमारे २००० आहे. गावातील सुमारे ९०-९५ टक्के नागरिक रिलायन्स जिओचे सिमकार्ड व वाय-फाय सेवा वापरत आहेत. गावात जिओचा टॉवर असतानाही नेटवर्कची समस्या कायम असून त्याचा फटका केवळ फावडेवाडी गावालाच नव्हे तर आसपासच्या मुसळेवाडी, रामवाडी, तळेगाव यांसह अनेक गावांना बसत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

टॉवरच्या देखभाल- दुरुस्तीसाठी कंपनीचा कोणताही कर्मचारी नियमितपणे येत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. शिवाय वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात आले आहे.

नेटवर्कच्या समस्येमुळे शासकीय ऑनलाइन सेवा, विद्यार्थ्यांचे शिक्षण, शेतकऱ्यांचे डिजिटल व्यवहार, बँकिंग सेवा तसेच आपत्कालीन संपर्क व्यवस्था पूर्णतः विस्कळीत झाली आहे. विशेष म्हणजे गावातील अनेक तरुण विविध नामांकित कंपन्यांमध्ये 'वर्क फ्रॉम होम' पद्धतीने काम करत असून नेटवर्क नसल्यामुळे त्यांच्या रोजगारावरही परिणाम होतो आहे.

फावडेवाडी व परिसरातील हजारो नागरिकांना सध्या मोबाईल नेटवर्क अभावी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, जिओ कंपनीने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.पुढच्या दोन दिवसात सेवा जर पूर्ववत करण्यात आली नाही. तर मग मात्र जिओच्या कार्यालयात जाऊन मनसे स्टाईल आंदोलन करण्यात येईल आणि त्याची सर्वस्व जबाबदारी जिओ ची राहील अशा इशारा मनसेचे युवा नेते महादेव सीरसाट यांनी दिला आहे. तर सेवा तात्काळ पूर्ववत नाही केल्यास अगदी लोकशाही पद्धतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा फावडेवाडी गावचे माजी सरपंच तथा भाजपाचे युवा नेते संजय केंद्रे यांनी दिला आहे.

# शिवाजीनगर पोलिसांची मटका जुगाराविरुद्ध धडक कारवाई

## दोन कारवायांत १ लाख ५४ हजार ३० रुपयांचा मुद्देमाल जप्त तर दोन आरोपींवर गुन्हे दाखल

बीड (प्रतिनिधी)

बीड शहरातील अवैध जुगार व मटका व्यवसायाला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या सूचनेनुसार शिवाजीनगर पोलिसांनी मटका जुगाराविरुद्ध धडक कारवाई केली. धानोरा रोड, टी-पॉईंट, बीड येथे ६ ऑक्टोबर रोजी करण्यात आलेल्या दोन स्वतंत्र कारवायांमध्ये रोख रकमेसह मोटारसायकल व जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख ५४ हजार ३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पहिल्या कारवाईत रफीक बेग चाँद बेग याच्याकडून २,१३० रुपये रोख, चिठ्ठी बुक, कार्बनचा तुकडा आणि काळ्या रंगाचा बॉलपेन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई सायंकाळी सुमारे ५.४५ वाजता करण्यात आली.

त्यानंतर सायंकाळी ७.१५ वाजता करण्यात आलेल्या दुसऱ्या कारवाईत सुलतान खान सदाद पठाण याच्याकडून १,९०० रुपये रोख, चिठ्ठी बुक, कार्बनचा तुकडा, काळ्या रंगाचा बॉलपेन तसेच १ लाख ५० हजार रुपये किमतीची होंडा मोटारसायकल (क्र. एमएच २३ बीई ९५८२) असा एकूण १ लाख ५१ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.दोन्ही प्रकरणांत संबंधित



आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२ (अ) अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख व उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली, शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस उपनिरीक्षक माधव काटकर, ज्ञानेश्वर धोत्रे, पोहेकॉ रवींद्र गोवर्धन आघाव, पोशि सुरज राजेंद्र वाघमारे आणि पोशि राजाभाऊ जाधव यांनी सहभाग घेतला.

शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत अवैध जुगार, मटका व इतर बेकायदेशीर व्यवसायांविरुद्ध यापुढेही सातत्याने कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

# मराठवाडा राज्याच्या भाग की स्वातंत्र्य विभाग

## सहा दशकापासून सापत्य वागणूक; अनुशेष कधी पूर्ण होणार?

प्रासंगिक / अनुप कुसुमकर

एल निनो च्या पार्श्वभूमीवर राज्याचा मराठवाडा अक्षरशः होरपळून निघत असताना मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष हा महाराष्ट्र राज्याच्या राजकारणातील आणि आर्थिक नियोजनातील एक अत्यंत संवेदनशील आणि कळीचा मुद्दा आहे. उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा हा ऐतिहासिक, भौगोलिक आणि राजकीय कारणांमुळे अनेक क्षेत्रांत मागे राहिला आहे.

विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण आदींसह राज्याच्या इतर विभागीय महसुल क्षेत्राच्या मानाने मराठवाड्याला राज्य सरकार कडून सापत्य वागणूक ही पूर्वापार पासून मिळत आलेली आहे. राज्याच्या आणि देशाच्या राजकारणात अनेक प्रतिभावंत राजकीय महानुभूतिनी आपले कर्तृत्व दाखवत मराठवाड्याची भूमी अजरामर केली मात्र शासन दरबारी श्वास्वत विकासाबाबत मराठवाडा नेहमीच मागास राहिला आहे. मजुरी, ऊसतोड कामगार जिल्हा म्हणून ओळख असलेल्या या भागाची ही कलंक सहा दशकांनंतर ही या भागातील लोक प्रतिनिधी आणि शासनकर्त्यांना पुसण्यात अपयश आले आहे.

सिंचन आणि पाणीसाठ्याचा अनुशेष

मराठवाड्यातील अनुशेषाचा सर्वात मोठा आणि गंभीर भाग हा सिंचनाशी संबंधित आहे.पाण्याचे दुर्भिक्ष, अवर्षण आणि अतिवृष्टी यामुळे मराठवाडा हा बारमाही दुष्काळग्रस्त भाग म्हणून ओळखला जातो. येथे पर्जन्यमान अनिश्चित आहे.गोदावरी खोरे व इतर नद्यांवर सिंचन



प्रकल्पांची घोषणा होऊनही अनेक प्रकल्प दशकांपासून रखडले आहेत. प्रत्यक्ष सिंचनाखालील क्षेत्र महाराष्ट्राच्या इतर महसुली भागाच्या तुलनेत खूप कमी आहे.यामुळे अनेक भागांत उन्हाळ्यात आणि अनेक वेळा पावसाळ्यात देखील टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो. जलयुक्त शिवार योजना मधील तथाकथित फसवेगिरी किंवा इतर योजनांचे काम अपूर्ण राहिल्यामुळे भूजल पातळी खालावली आहे.

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वगळता मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांमध्ये (जसे की बीड, धाराशिव, परभणी, हिंगोली) मोठे उद्योग किंवा बहुराष्ट्रीय कंपन्या मोठ्या प्रमाणावर आकर्षित झालेल्या नाहीत. यामुळेच उद्योगधंदे नसल्यामुळे स्थानिक युवकांकडे रोजगाराची कमतरता असून मराठवाड्यातील नागरिक मोठ्या प्रमाणावर मजुरी, ऊसतोड कामगार राज्यात व परराज्यात स्थलांतरीत (मजुरांचे लोंढे) होतात.

कृषी आणि शेतीपूरक व्यवसायांचा अनुशेषमराठवाड्यात शेती मुख्य व्यवसाय असली तरी शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग व शीतगृहे अपुरी आहेत. कापूस, सोयाबीन, तूर उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळण्यासाठी आवश्यक यंत्रणा नाही. ऊस लागवडीकडे या भागातील शेतकरी वळला असला तरी ऊसाला किफायतशीर भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांची उन्नती होत नाही.

दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालन:महाराष्ट्राच्या इतर धर्तीवर इथे सहकारी दूध संघ किंवा जोडधंद्यांचे जाळे उभे राहिलेले नाही, ज्यामुळे शेतकरी पूर्णपणे निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून राहतो.या सोबतच निजाम राजवट पासून दळणवळणाच्या बाबत मराठवाडा हा भाग उपेक्षित राहिला. अनेक महत्त्वाची गावे आजही चांगल्या रस्त्यांनी जोडलेली नाहीत. रेल्वेचे अनेक मार्ग किंवा दोपदरीकरणाचे प्रकल्प दशकानुदशके रखडल्याचे दिसून येते.

# नापिकीला कंटाळुन पैठणच्या शेतकऱ्याची आत्महत्या

केज।प्रतिनिधी

केज तालुक्यातील पैठण सावळेश्वर येथील अल्पभूधारक शेतकरी अनिल भीमराव कसबे वय ३५ वर्षे यांनी नापिकीला कंटाळून पहाटे राहत्या घरी गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

अनिल भीमराव कसबे हे १३ गुंठे जमीन असलेले अल्प भूधारक शेतकरी होते.बांधकाम मिस्त्री म्हणुनही ते काम करीत असत. वडील कॅन्सरने पिडीत झाले होते.व मागील चार महिन्यापूर्वीच त्यांच्या पत्नीचे निधन ही झाले होते.तेंव्हा पासुन अनिल कसबे ह उदास होते.त्यातच खरीप हंगामात पावसाने दडी मारल्या मुळे १३ गुंठे जमिनी तून आपल्या हाती काय पडणार ? या विवंचनेतून त्यांनी गुरूवार दि.१ आक्टोबर रोजी पहाटे साडे पाच वाजण्याच्या दरम्यान राहत्या घरी पत्र्याच्या अडूला गळफास घेवून आत्महत्या केली. त्यांच्या पश्चात आई, वडील,विवाहित भाऊ, एक मुलगी असा परिवार असून,त्यांच्या पार्थिवावर



गुरूवारी दुपारी पैठण सावळेश्वर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.अनिल कसबे यांचे वडील भीमराव कसबे यांच्या फिर्यादी वरून मंगळवार दि.६ आक्टोबर रोजी सायंकाळी नापिकीला कंटाळून आत्महत्या केल्या प्रकरणी युसूफ वडगाव पोलिसात नोंद करण्यात आली असून पुढील तपास जमादार अनिल बिक्कड ह करीत आहेत.शेतकरी आत्महत्येची या आठवड्यातील तिसरी घटना आहे.यापूर्वी येवता आणि चिंचोली माळी येथिल शेतकऱ्यांनी नापिकीला कंटाळून आत्महत्या केली होती.

# उपविभागीय अधिकारी बीड कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समिती शिरूर येथे आढावा बैठक संपन्न

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील संभाव्य पाणीटंचाईवर उपाययोजना करण्यासाठी आज पंचायत समिती सभागृहात उपविभागीय अधिकारी बीड कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली संभाव्य परिस्थितीत करावयाच्या विविध उपयोजनांच्या अनुषंगाने सर्व ग्रामपंचायतचे सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, पाणीपुरवठा विभागाशी संबंधित अधिकारी यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीत गावनिहाय आढावा घेऊन प्रत्येक गावाची वस्तुस्थिती विचारात घेऊन कोणत्या संभाव्य उपाययोजना करणे अपेक्षित आहे, यावर चर्चा करण्यात आली. यामध्ये विहीर अथवा बोअरवेल अधिग्रहण करणे, सार्वजनिक विहिरीतील गाळ काढणे, सार्वजनिक विहिरी पासून गावापर्यंत



पूरक नळयोजना, नादुरुस्त असलेल्या नळ योजनांची दुरुस्ती, जल जीवन मिशनच्या विहिरींची कामे पूर्ण करणे, नवीन विंधन विहीर घेणे, हातपंप दुरुस्ती, टँकर द्वारे पाणीपुरवठा इत्यादी उपायोजनाद्वारे गावातील लोकसंख्या व गुरेढोरे यांची संख्या विचारात घेऊन पाण्याची गरज निश्चित करून या उपाययोजना वस्तुनिष्ठपणे प्रस्तावित कराव्यात, टँकरद्वारे पाणीपुरवठा करताना नजीकच्या पाणी स्रोतांचा विचार करावा, या दृष्टीने सूचना देऊन दोन दिवसात सर्व प्रस्ताव पंचायत समितीत सादर करणे बाबत निर्देश देण्यात आले, त्यावरून तालुक्याचा पुढील आठ महिन्याचे नियोजन विचारात घेऊन पाणीटंचाई कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे.

तरी भविष्यात पाणीटंचाईवर उपाययोजना करण्यासाठी नागरिकांनी आपल्या अडचणी आपापल्या ग्रामपंचायतीकडे मांडाव्यात ग्रामपंचायत प्रस्ताव पंचायत समितीकडे प्राप्त होतील व संबंधित गावांना त्यांचाही कृती आराखड्यानुसार त्या त्या उपाययोजना वेळेवर सुरू करता येतील.

तसेच ग्रामपंचायतच्या अथवा सार्वजनिक मालकीतील कोणत्याही विहिरीवरून कोणत्याही खाजगी व्यक्तीने वैयक्तिक फायद्यासाठी पाणी उपसा करू नये, अन्यथा संबंधिताविरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल.

सुरेश घोळवे,
तहसीलदार शिरूर कासार

# शिरूर पोलिसांच्या सतर्कतेमुळे चोरीला गेलेली दुचाकी सापडली

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर कासार शहरातील प्रभाग क्रमांक सतरा मधील जिजामाता चौक परिसरात असलेल्या सोसायटी मधून मंगळवारी मध्यरात्री एक दुचाकी चोरीला गेली होती.चक-२३ -झ-३१०८ या क्रमांकाची उढ १०० बजाज कंपनीची अशोक किसन पाठक यांच्या मालकीची सदरील गाडी होती.अशोक पाठक यांनी बुधवारी सकाळी गाडी लावलेल्या ठिकाणी जाऊन पाहणी केली असता गाडी तेथे नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.त्यांनी सदरील प्रकार सहपोलीस निरीक्षक राजेश गडवे यांना सांगितला.त्यानंतर सहपोलीस निरीक्षक राजेश गडवे यांनी पोलिस कर्मचारी बाळासाहेब सुरवसे आणि सचिन डिडूळ यांना दुचाकीचा शोध घेण्यासंदर्भात सूचना केल्या.पोलिस हवालदार बाळासाहेब सुरवसे,सचिन डिडूळ आणि कॉन्स्टेबल सोपान विधाते यांनी शोधमोहीम हाती घेत तपास लावला.सदरील दुचाकी प्राथमिक आरोग्य केंद्रासमोर आढळून आली.शिरूर पोलिसांनी तात्काळ शोधमोहीम हाती घेतल्यामुळे चोवीस तासांच्या आत गाडीमालकाला गाडी परत मिळाली.

# चौथ्या विजयासाठी सतीश चव्हाण पुन्हा मैदानात;सातत्यपूर्ण जनसंपर्क आणि संघटनात्मक बांधणीवर भर

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे सलग तीन वेळा प्रतिनिधित्व केलेले आ. सतीशराव चव्हाण यांनी आगामी विधान परिषद निवडणुकीसाठी ५ ऑक्टोबर २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. राष्ट्रवादी काँग्रेसकडून त्यांना अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यात आली असून, महायुतीकडूनही त्यांची उमेदवारी निश्चित झाली आहे.

आ. सतीशराव चव्हाण यांनी २००८, २०१४ आणि २०२० या तीनही निवडणुकांमध्ये विजय मिळवत या मतदारसंघाचे सलग तीन वेळा प्रतिनिधित्व केले आहे. २०२०च्या निवडणुकीत त्यांनी १ लाख १६ हजार ६३८ मते मिळवत मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला होता. त्यामुळे आगामी निवडणुकीत चौथ्यांदा मतदारांचा कौल मिळविण्यासाठी त्यांनी पुन्हा निवडणुकीच्या मैदानात प्रवेश केला आहे.

गेल्या सुमारे १८ वर्षांच्या कालावधीत मतदारसंघातील पदवीधर मतदारांशी सातत्याने संपर्क ठेवणे, त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि शिक्षण, रोजगार, विद्यार्थी, शिक्षक तसेच सामाजिक प्रश्नांवर विधान परिषदेत आवाज उठविणे, ही आ. चव्हाण यांच्या कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये असल्याचे त्यांच्या समर्थकांकडून सांगण्यात येत आहे. निवडणुकीपुरता मर्यादित संपर्क न ठेवता वर्षभर पदवीधरांशी संवाद साधण्यावर त्यांनी भर दिल्याचा दावा समर्थकांकडून करण्यात येतो.

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड आणि हिंगोली या आठ जिल्ह्यांचा समावेश असलेल्या या मतदारसंघात व्यापक संपर्क ठेवणे हे मोठे आव्हान मानले जाते. या पार्श्वभूमीवर प्रत्येक जिल्हा, तालुका आणि ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांशी समन्वय साधून संघटनात्मक बांधणी मजबूत करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे.

पदवीधर मतदारांची नोंदणी, नव्या मतदारांशी संपर्क, कार्यकर्त्यांच्या बैठका, स्थानिक पातळीवरील समन्वय तसेच मतदारांच्या विविध प्रश्नांचा आढावा घेण्याच्या माध्यमातून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक हालचालींना वेग आला आहे. दीर्घकाळ मतदारसंघाशी असलेला संपर्क आणि स्थानिक पातळीवर उभे राहिलेले कार्यकर्त्यांचे जाळे ही आगामी निवडणुकीतील महत्त्वाची बाब ठरणार असल्याचे समर्थकांचे म्हणणे आहे.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या



माध्यमातून शिक्षण क्षेत्राशी संबंधित विविध उपक्रमांमध्ये आ. चव्हाण यांचा सहभाग राहिला आहे. शिक्षक, पदवीधर आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना त्यांनी विधान परिषदेत वेळोवेळी वाचा फोडल्याचे त्यांच्या समर्थकांकडून नमूद करण्यात येत आहे. शिक्षण आणि रोजगाराच्या संधी, विद्यार्थ्यांच्या अडचणी, शैक्षणिक संस्थांचे प्रश्न तसेच सामाजिक विषयांवर सातत्याने भूमिका मांडण्याचा प्रयत्न केल्याचा दावाही करण्यात येत आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी ५ ऑक्टोबर रोजी सतीश भानुदासराव चव्हाण यांची छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघासाठी पक्षाचे उमेदवार म्हणून अधिकृत घोषणा केली. त्यानंतर त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि शिवसेना या घटक पक्षांच्या नेत्यांचीही अर्ज दाखल करताना उपस्थिती राहिली.आगामी काळात पदवीधर मतदारांशी थेट संवाद वाढविणे, मतदार नोंदणीबाबत जनजागृती करणे, कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढविणे आणि आठही जिल्ह्यांतील स्थानिक पातळीवरील संपर्क अधिक व्यापक करण्यावर भर दिला जाणार असल्याचे समर्थकांकडून सांगण्यात येत आहे. आ. सतीशराव चव्हाण यांच्या उमेदवारीमुळे छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदारसंघातील राजकीय हालचालींना वेग आला असून, आगामी निवडणुकीकडे संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागले आहे.चौथ्यांदा मतदारांचा कौल मिळविण्यासाठी सातत्यपूर्ण जनसंपर्क, मतदारसंघातील प्रश्नांची जाण आणि स्थानिक संघटनात्मक बांधणी या मुद्द्यांवर भर देत निवडणुकीला सामोरे जाण्याची तयारी आ. चव्हाण यांच्या समर्थकांकडून करण्यात येत आहे.

# जिल्ह्यात ‘सेवा संकल्प अभियान’ उत्साहात सुरु

## महसूल प्रशासनाच्या माध्यमातून ६७८ नागरिकांना विविध सेवांचा प्रत्यक्ष लाभ





बीड (जिमाका)

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि जिल्हाधिकारी कार्यालय बीडच्या नियंत्रणाखाली जिल्ह्यात सध्या ‘सेवा संकल्प अभियान’ अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या निर्धारित कालावधीत हे अभियान कार्यान्वित असून, याद्वारे ग्रामीण भागातील नागरिकांचे विविध महसुली व शासकीय प्रश्न तातडीने व एकाच छताखाली सोडविण्यावर भर दिला जात आहे. या अभियानांतर्गत तालुका स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येत असून, विविध योजनांचा व सेवांचा लाभ थेट सामान्य जनतेपर्यंत पोहोचवला जात आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून प्राप्त झालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, अभियानाचे गांभीर्य लक्षात घेऊन १७ सप्टेंबर २०२६ ते ६ ऑक्टोबर २०२६ या अवघ्या काही दिवसांच्या टप्प्यात एकूण ६७८ नागरिकांना विविध शासकीय सेवांचा प्रत्यक्ष लाभ देण्यात आला आहे. यामध्ये महसूल विभागाशी संबंधित अनेक प्रलंबित प्रकरणांचा यशस्वी निपटारा करण्यात प्रशासनाला मोठे यश आले आहे.

विविध सेवांचा तपशील आणि प्रशासकीय कार्यवाही:

या अभियानांतर्गत शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या विविध कागदपत्रांच्या व प्रमाणपत्रांच्या अडचणी दूर करण्यात आल्या आहेत. प्रलंबित फेरफार नोंदींचा निपटारा करणे या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यात तब्बल २६२ प्रकरणांचा यशस्वी निकाल लावण्यात आला आहे. तसेच मालमत्ता हस्तांतरणाची नोंद घेण्याच्या १०५ प्रकरणांची पूर्तता करण्यात आली असून, गावकऱ्यांना दस्तऐवज आणि नोंदी अद्ययावत करणे सोपे झाले आहे. याशिवाय नागरिकांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कामांसाठी अत्यंत आवश्यक असणारे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र ९५ पात्र नागरिकांना तात्काळ वितरित करण्यात आले आहेत.

जन्म आणि मृत्यूची नोंद घेणे तसेच त्यांचे अधिकृत प्रमाणपत्र देण्याच्या प्रकरणात ६८ नागरिकांना लाभ मिळाला आहे. नागरिकांना दैनंदिन जीवनात व प्रशासकीय कामांसाठी उपयोगी पडणाऱ्या शिधापत्रिका (रेशन कार्ड) वितरणांतर्गत ३२ पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिका देण्यात आल्या आहेत. ग्रामीण भागातील पाणीपुरवठा व वीज जोडणीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पावले उचलताना नवीन नळ जोडण्या देण्यासाठी ५० जणांना मंजुरी देण्यात आली आहे, तर प्रलंबित घरगुती विद्युत जोडणीस मंजुरी देण्याच्या प्रकरणात ५ नागरिकांचे प्रश्न मार्गी लागले आहेत.

याशिवाय, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत सिंचन विहिरींसाठी अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांच्या २ ऑनलाईन नोंदी करण्यात आल्या आहेत. दिव्यांग कल्याण व सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने ५ जणांना दिव्यांग प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. विवाह नोंदणीचे ३ दाखले वितरित करण्यात आले असून, नऊ नागरिकांना नवीन आधार कार्ड व त्यासंबंधित सेवांचा लाभ देण्यात आला आहे. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने पाऊल टाकत महिला बचत गटांच्या नोंदणीची ५ प्रकरणे पूर्ण करण्यात आली आहेत. शेतकरी वर्गाच्या जमिनीच्या नोंदी अधिक अचूक करण्यासाठी ७/१२ व ८ अ च्या नोंदी अद्ययावत करण्याच्या १२ कारवाया पूर्ण झाल्या असून, जमिनीचे खरेदी-विक्री व्यवहार जमिनीच्या मोजणीशी जोडण्याचे ३ संदर्भ यशस्वीरीत्या जोडण्यात आले आहेत. एफआरए (त्रीशीीं ठळसहीी -लीं) अंतर्गत ७ ई/१२ ई दाखले ५ जणांना वाटप करण्यात आले आहेत, तर व्हीजेटीएन (तगछढ) प्रवर्गातील ११ जणांना जात प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली आहेत.

नागरिकांचा वाढता प्रतिसाद आणि प्रशासकीय यंत्रणेचे योगदान:

तालुका स्तरावर आयोजित या शिबिरांमुळे नागरिकांना आपल्या कामांसाठी जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणी वा वारंवार कार्यालयात फेऱ्या मारण्याची गरज उरलेली नाही. एकाच ठिकाणी महसूल आणि इतर संलग्न विभागांचे अधिकारी उपलब्ध राहत असल्याने लोकांच्या अडचणी तत्काळ समजून घेऊन त्यावर जागेवरच तोडगा काढला जात आहे. बीड जिल्ह्यात महसूल प्रशासनाच्या या उपक्रमाला नागरिकांकडून अत्यंत उत्स्फूर्त आणि सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, आगामी काळात अधिकाधिक लोकांपर्यंत या सेवा पोहोचवण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले आहे. या अभियानामुळे पारदर्शकता वाढून शासकीय यंत्रणा थेट जनतेच्या दारात पोहोचल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# अंबासाखर कारखान्यासमोर अपघातग्रस्त गाड्यांची चाके चोरीला!



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबा साखर कारखाना ते ममदापूर रोडवर रस्त्याच्या कडेला पडून असलेल्या दोन अपघातग्रस्त दुचाकींची मागची चाके अज्ञात चोरट्याने लांबवल्याचा विचित्र प्रकार उघडकीस आला आहे. २ ऑक्टोबर रोजी याच ठिकाणी दोन्ही गाड्यांचा भीषण अपघात झाला होता.

यासंदर्भातील सविस्तर वृत्त असे की, अंबा साखर कारखाना ते ममदापूर रोड या रस्त्यावर कारखान्याच्या एकदम समोरील रस्त्यावर स्प्लेंडर दुचाकी (क्रमांक: चक ४४ क ८५७४) आणि पॅशन प्रो दुचाकी (क्रमांक: चक १३ -थ ३२३०) यांच्यात समोरासमोर जोरदार धडक झाली होती. या अपघातात दोन्ही गाड्यांचा चक्काचूर झाला व चालक जखमी झाले होते. अपघातानंतर जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

मात्र, अपघातग्रस्त वाहने कारखान्याच्या एकदम समोरील रस्त्यावर तशीच पडून राहिल्याचा फायदा घेत भामट्याने दोन्ही दुचाकींची मागची चाके काढून नेली. अपघातग्रस्त वाहनांचीही चोरी होत असल्याने परिसरात आश्चर्य व्यक्त होत असून, अशा चोरट्यांवर पोलिसांनी कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.

# तारिणी उद्योग समुहा च्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण



केज ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील तारिणी उद्योग समुहा च्या संस्थापिका कु. दिपाली राजेंद्र राऊत यांनी श्री संस्कार इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षा घेवून परिक्षेत विषेश प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करुन पारितोषिके वितरीत करण्यात आले.या विषयी सविस्तर वृत्त असे की, केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील कु.दिपाली राजेंद्र राऊत या युवतीने अल्पावधीतच तारिणी उद्योग समुहाच्या माध्यमातून मोरींगा पावडर सारख्या उत्पादनासाठी संबंध महाराष्ट्र नावलौकिक मिळविला आहे. व्यवसायाबरोबरच आपली सामाजिक बांधिलकी जोपासत शालेय विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला,मेहनतीला, सृजनशीलतेला आणि त्यांच्या स्वप्नांना प्रोत्साहन देण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षा घेवून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करित आहेत.त्याचाच एक भाग म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या मनातील एक सुंदर विचार,स्वप्न किंवा प्रेरणादायी वाक्य लिहीण्याची स्पर्धा परीक्षा येथील श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये घेण्यात आली होती.आणि या मध्ये विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण करुन सन्मान करण्यात आला.या परिक्षेत श्री संस्कार इंग्लिश स्कूल मधील चि.सोहम प्रविण कदम वर्ग ३ रा याने प्रथम क्रमांक पटकावला तर द्वितीय क्रमांक कु. कृष्णाली पद्मसिंह देशमुख वर्ग ३रा हिने पटकावला तर चि. स्वराज अशोक कुदळे वर्ग ५ वा याने पटकावला या तीनही विद्यार्थ्यांना विशेष पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले तर सहभागी झालेल्या सर्वच विद्यार्थ्यांना मोरींगा पावडर वितरीत करण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री संस्कार इंग्लिश स्कूल च्या उपप्राचार्या रजनी देशमुख या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून पुजा कदम मॅडम, कोमल कापरे मॅडम, पुजा चंदनशिव मॅडम, प्रियंका शिंदे मॅडम, वैष्णवी काळे मॅडम, सारिका गव्हाणे मॅडम या होत्या.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उप प्राचार्या रजनी देशमुख यांनी केले तर सुत्रसंचलन अनिल गलांडे यांनी केले.

# जाटवड अठ्ठावन्न वर्षीय ईसमाने केली आत्महत्या !



मानूर ।प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील मानुर जवळ असलेल्या जाटवड येथे एका अठ्ठावन्न वर्षीय ईसमाने मंगळवारी रात्रीच्या वेळी लमाणतळ नामे शेतात लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली असुन नागरगोजे व खाडे पोलीसांनी घटना स्थळी भेट दिली असुन मयत ईसमाचे नाव श्रीधर तुळशिराम बडे असल्याचे सांगितले गेले .

जाटवड येथील रहिवासी असलेले श्रीधर बडे एक शेतकरी असुन ते दिवसभर शेळ्या चारून त्याना घरी नेऊन बाधल्यानंतर नापिकी , दुष्काळ यावर कशी मात करणार ?कुटूंब कसे जगवणार ?या विवचनेतून गळफास घेतल्याची प्राथमीक माहिती सांगितली जाते पोलीसाच्या तपासात आत्महत्तेचे कारण स्पष्ट होणार आहे .

मयत श्रीधर बडे यांचे पश्चात पत्नी दोन मुल पैकी एक मुलगा भेंडा सहकारी कारखान्यावर ऊस तोडीसाठी गेला होता , एक विवाहीत मुलगी असा परिवार आहे . दुष्काळ आहे त्याला सर्वांनाच सामोरे जावे लागणार आहे मात्र असा अविचारीपणा कुणीही करू नये व आत्महत्या करून आपले कुटूंब उघड्यावर टाकून त्यांना पोरके करू नये असे आवाहन यावेळी मा . जिल्हा परिषद सदस्य रामदास बडे यांनी केले .

# दुष्काळाची पाहणी शेतकऱ्यांशी थेट संवाद विजय वडेट्टीवार आज जालन्यात

मंठा,परतूर,जालना, भोकरदन व जाफराबादचा दौरा आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचीही घेणार सांत्वनपर भेट

जालना ।प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त परिस्थितीची पाहणी करून शेतकरी शेतमजूर व नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते तथा माजी मंत्री आमदार विजय वडेट्टीवार हे गुरुवार दि. ८ व शुक्रवार दि. ९ ऑक्टोबर रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात विविध दुष्काळग्रस्त भागांना भेटी देऊन ते शेतकऱ्यांशी थेट संवाद साधणार आहेत.

वडेट्टीवार यांच्या समवेत खासदार डॉ. कल्याणराव काळे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष कल्याणराव दळे, माजी आमदार राजेश राठोड, राजेंद्र राख, बदर चाऊस, राजाभाऊ देशमुख यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी सहभागी होणार आहेत.

गुरुवारी दुपारी ४ वाजता मंठा येथे वडेट्टीवार यांचे आगमन होणार असून याठिकाणी दुष्काळग्रस्त परिस्थितीची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला जाणार आहे. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता परतूर येथे शेतकरी संवाद व दुष्काळ पाहणीचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर हडप, ता. जालना येथे त्यांचा मुक्काम राहणार आहे.

शुक्रवारी सकाळी ८.३० वाजता जालना तालुक्यातील कचरेवाडी वानडगाव फाटा येथे भेट देऊन दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यात येणार आहे. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या जाणार आहेत. सकाळी ९ वाजता पिरपिंपळगाव येथे आत्महत्या केलेले शेतकरी स्व. विष्णू तुळशीराम कोल्हे यांच्या कुटुंबीयांची वडेट्टीवार सांत्वनपर भेट घेणार आहेत.

यानंतर सकाळी १० वाजता भोकरदन आणि ११ वाजता जाफराबाद येथे शेतकरी संवाद व दुष्काळ पाहणीचे कार्यक्रम होणार आहेत. जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर व नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेणे त्यांच्या मागण्या आणि अडचणी समजून घेणे तसेच दुष्काळाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधणे, हा या दौऱ्याचा



उद्देश असल्याचे काँग्रेसकडून सांगण्यात आले.

दौऱ्याची माहिती जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अशोक उबाळे व सरचिटणीस शांतीलाल बनसोडे यांनी दिली.



# संभाजीराव बुचकुल यांची संचालकपदी बिनविरोध निवड

बदनापूर ।प्रतिनिधी

कन्या हायस्कूल, बदनापूर येथील कर्मचारी संभाजीराव बुचकुल यांची जालना जिल्हा अशासकीय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित जालना या संस्थेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाली आहे.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या हितासाठी कार्यरत असलेल्या पतसंस्थेच्या संचालकपदाची जबाबदारी संभाजीराव बुचकुल यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यांच्या बिनविरोध निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष सचिव तसेच कन्या हायस्कूल बदनापूर येथील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

बुचकुल यांच्या निवडीमुळे कर्मचारी वर्गात उत्साहाचे वातावरण असून त्यांच्या अनुभवाचा व कार्यक्षमतेचा संस्थेच्या कामकाजाला निश्चितच लाभ होईल असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. त्यांच्या निवडीचे शैक्षणिक व कर्मचारी क्षेत्रातून स्वागत होत आहे.

# तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत शृंगेरी विद्यालय ब्रह्मगावचा डंका

## विविध क्रीडा प्रकारांत विद्यार्थिनींची दमदार कामगिरी




आष्टी - (एस.राजेंद्र लाड) महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत ब्रह्मगाव (ता. आष्टी, जि. बीड) येथील शृंगेरी विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी विविध मैदानी क्रीडा प्रकारांत दमदार कामगिरी करत विद्यालयाचा क्रीडा क्षेत्रातील दबदबा कायम राखला आहे. आष्टी येथील हंबर्डे महाविद्यालयाच्या तालुका क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेत विद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश मिळवत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले.

१४ वर्षे वयोगटातील थाळीफेक या क्रीडा प्रकारात कु. दिव्या मारुती सानप हिने प्रथम क्रमांक, तर कु. अंजली बाळू सानप हिने द्वितीय क्रमांक मिळविला. १७ वर्षे वयोगटातील थाळीफेक प्रकारात कु. नेहा जोगदंड हिने प्रथम क्रमांक पटकावला. गोळाफेकमध्येही शृंगेरी विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी आपले वर्चस्व कायम राखले. १४ वर्षे वयोगटात कु. शीतल विठ्ठल माळी हिने प्रथम, तर कु. गीता सोमनाथ पवार हिने द्वितीय क्रमांक मिळविला. १७ वर्षे वयोगटातील गोळाफेकमध्ये कु. खुशी अमोल उबाळे हिने प्रथम, तर कु. ऋतुजा गुलाब हराळ हिने द्वितीय क्रमांक पटकावला.

दरम्यान, १४ वर्षे वयोगटातील २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत कु. तेजल रामदास गर्जे हिने प्रथम क्रमांक, तर कु. ऋतुजा सुभाष हराळ हिने द्वितीय क्रमांक मिळवत तालुकास्तरीय स्पर्धेत यश संपादन केले. विविध क्रीडा प्रकारांत मिळविलेल्या या यशामुळे शृंगेरी विद्यालयातील विद्यार्थिनींच्या क्रीडा कौशल्याची चमक पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

या यशाबद्दल शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार भीमरावजी धोंडे, महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा युवा नेते डॉ. अजयदादा धोंडे, प्रशासन अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, शिवदास विधाते सर, माऊली बोडखे सर, सागर वाघुले सर, नन्नवरे सर, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सविता माने, क्रीडा शिक्षक पठाण सर, गदादे सर, शिंदे सर, बनसोडे सर, धोत्रे सर, राहुल पवार सर, श्रीमती साळप्पा मॅडम, शिंदे मॅडम, युनूस मामा व खिल्लारे मामा आदींनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थिनींना क्रीडा शिक्षक पठाण सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींनी सातत्यपूर्ण सराव आणि मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. तालुकास्तरीय स्पर्धेत शृंगेरी विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी मिळविलेल्या या उल्लेखनीय यशामुळे ब्रह्मगावसह आंबेवाडी, कासेवाडी, शेकापूर, हाजीपूर व भाळवणी परिसराची मान उंचावली असून या यशाबद्दल परिसरातील ग्रामस्थांकडून विद्यार्थिनींचे कौतुक व अभिनंदन होत आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेतही या खेळाडूंनी उत्तम कामगिरी करून विद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# डोंगरगावच्या सौ. भागुबाई कारभारी उगले यांचे निधन

## वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन, आढळातीरी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

अकोले (प्रतिनिधी)

तालुक्यातील डोंगरगाव येथील जुन्या पिढीतील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व सौ. भागुबाई कारभारी उगले यांचे बुधवारी सकाळी वयाच्या ८५व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने उगले परिवारासह डोंगरगाव परिसरात शोककळा पसरली आहे.



सौ. भागुबाई उगले यांच्या पश्चात पती, दोन मुले, चार मुली, सुना, नातवंडे व पतवंडे असा मोठा परिवार आहे. डोंगरगावचे माजी उपसरपंच व पत्रकार अशोक उगले, प्रगतिशील शेतकरी सोमनाथ उगले, सौ. अलका लहानू फटांगरे, सौ. जिजा दिलीप लांडगे, सौ. बेबी बाळासाहेब सहाणे व सौ. मीना कारभारी उगले यांच्या त्या मातोश्री होत. सौ. भागुबाई उगले यांचे कुटुंब व समाजाशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार तसेच ग्रामस्थांनी अंत्यदर्शनासाठी मोठी गर्दी केली.

त्यांच्यावर डोंगरगाव येथे आढळातीरी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, ग्रामस्थ, मित्रपरिवार व विविध क्षेत्रातील मान्यवरांसह मोठा जनसमुदाय उपस्थित होता. उपस्थितांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून उगले परिवाराचे सांत्वन केले.

# मुलींची शासकीय निवासी शाळा पाटोदाची भूमिका अभिनय स्पर्धेत राज्यस्तरावर निवड

पाटोदा ।प्रतिनिधी

प्रादेशिक विद्या प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर येथे विभागस्तरीय भूमिका अभिनय व लोकनृत्य स्पर्धा पार पडल्या. राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण प्रकल्प २०२६ - २७ अन्वये भूमिका अभिनय व लोकनृत्य स्पर्धेचे आयोजन शासकीय, व जिल्हा परिषद शाळेसाठी दरवर्षी केले जाते. या स्पर्धा तालुकास्तर ते राष्ट्रीय स्तरापर्यंत असतात.जिल्हास्तरीय लोकनृत्य, भूमिक अभिनय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकवून दुहेरी यश संपादन केले व शाळेची विभागस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

विद्या प्राधिकरण (आंगलभाषा तज्ञत्व) छत्रपती संभाजी नगर येथे विभागस्तरीय भूमिक अभिनय स्पर्धा पार पडल्या.यात संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, बीड असे एकूण पाच जिल्ह्याच्या संघांचा समावेश होता यात शासकीय निवासी शाळा पाटोदा येथील




विद्यार्थिनींनी बीड जिल्ह्याचे नेतृत्व विभागस्तरावर करत उत्कृष्ट सादरीकरण करून विभागस्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

पोषण, आरोग्य व स्वछता हा विषय घेऊन विद्यार्थिनींनी उत्कृष्ट सादरीकरण भूमिक अभिनय मध्ये करून विभागस्तरावर प्रथम क्रमांक मिळवून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी संघाची निवड झाली.

सध्या आरोग्य व पोषण व स्वछता याची शालेय व जन जागृती शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांसाठी व्हावी म्हणून पोषण, आरोग्य, व स्वछता हा विषय स्पर्धेसाठी घेण्यात आल्याचे मुख्याध्यापिका अस्मिता जावळे यांनी सांगितले.विद्यार्थिनींनी आपल्या कलगुणांचे उत्कृष्ट सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली.विद्यार्थिनीच्या या यशामागे त्यांचे परिश्रम, मुख्याधापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन यांचा महत्वाचा वाटा आहे.या स्पर्धेत सहभागी विद्यार्थिनी निशा काळे, करुणा भिसे, पायल भालेराव, दिव्या मोरे, पूजा मोरे यांनी उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थित प्रेषक व परीक्षक यांची दाद मिळविली.

या यशाबद्दल दिपक खरात प्रादेशिक उपायुक्त छत्रपती संभाजी नगर, सहायक आयुक्त प्रदीप भोगले, विशेष अधिकारी देशपांडे, गोरे तसेच डाएट चे अधिवाख्यता गोरे मुख्याध्यापिका अस्मिता जावळे, शिक्षक तरकसे, मुंढे, वैराल, शेळके, जावळे, उकांडे, श्रीम. अस्वर, धोंडे, शेवाळे सर्वांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.राज्यस्तरीय स्पर्धेतही विद्यार्थिनी उत्कृष्ट कामगिरी करून निवासी शाळेचे पाटोदा व बीड जिल्ह्याचे नाव उज्वल करतील असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# नांदूरघाट ग्रामपंचायतीचा कारभार वाऱ्यावर

## भ्रष्टाचाराच्या गदारोळामुळे अधिकाऱ्यांचा येण्यास नकार,पिण्याच्या पाण्यासह नागरी समस्या बिकट

केज/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील नेहमीच विविध वादांमुळे चर्चेत असलेल्या नांदूरघाट ग्रामपंचायतीचा कारभार पूर्णपणे विस्कळीत झाला आहे सततचे भ्रष्टाचाराचे आरोप,घोटाळ्यांचे वाद आणि अधिकाऱ्यांवर होणारे गुन्हे यांमुळे नांदूरघाट ग्रामपंचायतीत येण्यास कोणताही ग्रामविकास अधिकारी किंवा ग्रामसेवक धजावत नसल्याचे गंभीर चित्र निर्माण झाले आहे. नांदूरघाट म्हटलं की नको रे बाबा! अशीच परिस्थिती सध्या प्रशासकीय वर्तुळात पाहायला मिळत आहे.




पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणि नागरी समस्या ऐरणीवर

ग्रामपंचायतीत कायम स्वरूपी आणि पूर्णवेळ अधिकारी नसल्यामुळे गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न,रस्ते, स्वच्छता तसेच इतर विकासकामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. नागरिकांना दैनंदिन लागणारे महत्त्वाचे दाखले,१५ व्या वित्त आयोगाची कामे आणि घरकुलांचे प्रस्ताव प्रलंबित पडल्याने ग्रामस्थांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

प्रभारी कारभाराचा खेळ आणि भ्रष्टाचाराचे सावट

सध्या ग्रामपंचायतीत अधिकारी फक्त काही दिवसांसाठी अतिरिक्त (प्रभारी) कारभार सांभाळण्यासाठी येतात.तात्पुरत्या पदभारावर येणारे अधिकारी गावात उपस्थित राहत नाहीत तसेच त्यांच्याकडे ग्रामपंचायतीचे महत्त्वाचे दस्तऐवज आणि कागदपत्रेही नसतात.सध्याचे ग्रामपंचायत अधिकारी श्री.शिरसाट बी.वाय. यांच्यावर गुन्हा नोंद झालेला असून ते ग्रामपंचायतीत अनुपस्थित राहत आहेत.तसेच ग्राम रोजगार सेवक (ऋढड) हे पदही रिक्त असल्याने मस्टर भरणे,मोजमाप व मजुरांची हजेरी अशी कामे रखडली आहेत, ज्यामुळे मनरेगा मजुरांचे पेमेंट थबकले आहे.

सदर अर्जाच्या प्रति बीडचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठवण्यात आल्या आहेत.आता तरी वरिष्ठ प्रशासन नांदूरघाट ग्रामपंचायती चा हा भ्रष्टाचाराचा आणि भोंगळ कारभाराचा चक्रव्यूह भेदून कायमस्वरूपी अधिकारी देणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# महिला बचत गटांना कर्जाचे बळ; शिरूर कासारात भव्य मेळावा

## नगरसेविका अश्विनीताई भांडेकर यांच्या आयोजनातून ९ ऑक्टोबरला कार्यक्रम

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर कासार नगरपंचायतीच्या नगरसेविका तथा महिला बचत गट प्रमुख सौ. अश्विनीताई गणेश (बप्पा) भांडेकर यांच्या पुढाकाराने शिरूर येथील सिद्धेश्वर संस्थानमध्ये शुक्रवार (दि. ९) रोजी सकाळी ११ वाजता भव्य महिला बचत गट मेळावा व कर्ज वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. मराठवाडा भूषण लोकनेते आमदार सुरेश (अण्णा) धस प्रतिष्ठान, नगरपंचायत शिरूर कासार आणि भारतीय स्टेट बँक कृषी व्यवसाय शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याचे माजी महसूल राज्यमंत्री तथा आमदार सुरेश (अण्णा) धस यांच्या हस्ते होणार असून, नगराध्यक्षा प्रतिभाताई रोहिदास गाडेकर अध्यक्षस्थानी राहणार आहेत. सिद्धेश्वर संस्थानचे ह.भ.प. विवेक महाराज शास्त्री प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

महानंद दूध संघाच्या संचालिका प्राजक्ताताई सुरेश धस यांचे यावेळी मार्गदर्शन होणार आहे. तसेच प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर, तहसीलदार सुरेश घोळवे, मुख्याधिकारी गणेश दहिफळे, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी पवार, भाजप तालुकाध्यक्ष सुरेश उगलमुगले, उपनगराध्यक्षा श्वेता देसरडा, ज्येष्ठ नेत्या चंपावती पानसंबळ, स्टेट बँक मॅनेजर प्रविन हासे आणि भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे तालुकाध्यक्ष फयाज भाई शेख यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने या मेळाव्यात कर्ज वितरण करण्यात येणार आहे. त्यामुळे शिरूर कासार तालुक्यातील महिला बचत गटांसाठी हा मेळावा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

कार्यक्रमास नगरपंचायतीचे आजी-माजी सभापती, नगरसेविका व प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.



तालुक्यातील जास्तीत जास्त महिला व नागरिकांनी या मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक सौ. अश्विनीताई गणेश (बप्पा) भांडेकर यांच्या वतीने करण्यात आले आहे

# कै.अनुसयाबाई पोकळे यांचा शुक्रवारी तेरावा विधी व गोड जेवणाचा कार्यक्रम

## ह.भ.प.अशोक महाराज भोसले यांचे होणार कीर्तन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) छत्रपती शाहू महाराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टीचे संस्थापक अध्यक्ष सुखदेव सूर्यभान पोकळे यांच्या मातोश्री कै. अनुसयाबाई सूर्यभान पोकळे (वय ९०, रा. बेलगाव) याचा तेरावा विधी व गोड जेवणाचा कार्यक्रम शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी बेलगाव येथे आयोजित करण्यात आला आहे.



कै. अनुसयाबाई पोकळे यांचे रविवार, दि. २७ सष्टेंबर रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले होते. त्यांच्या पार्थिवावर बेलगाव येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले होते. त्यांनी धार्मिक व सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुली, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने बेलगाव व आष्टी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

दिवंगत आत्म्यास चिरशांती लाभावी, यासाठी शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता बेलगाव (ता. आष्टी) येथे तेरावा विधी व गोड जेवणाचा कार्यक्रम होणार आहे. याप्रसंगी आळंदी येथील प्रख्यात भागवताचार्य ह.भ.प. अशोक महाराज भोसले यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे. या धार्मिक व श्रद्धांजली कार्यक्रमास सर्व नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार व ग्रामस्थांनी सहकुटुंब उपस्थित राहून दिवंगत आत्म्यास आदरांजली अर्पण करावी, असे आवाहन छत्रपती शाहू महाराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष सुखदेव सूर्यभान पोकळे, महादेव सूर्यभान पोकळे यांच्यासह समस्त पोकळे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे जिल्हाध्यक्ष यशवंत खंडागळे यांची मागणी

## आक्षेपार्ह वक्तव्यांबाबत प्रशासनाने दखल घ्यावी;अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलनाचा इशारा

आष्टी (प्रतिनिधी)

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार दिला असला, तरी या स्वातंत्र्याचा वापर करताना सामाजिक सलोखा, कायदा-सुव्यवस्था आणि व्यक्तीची प्रतिष्ठा यांचे भान राखणे आवश्यक असल्याचे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे जिल्हाध्यक्ष तथा आष्टी पंचायत समितीचे माजी सदस्य यशवंत खंडागळे यांनी व्यक्त केले.

आष्टी येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी सांगितले की, गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर काही व्यक्तींकडून करण्यात येणाऱ्या वक्तव्यांमुळे मतदारसंघातील सामाजिक व राजकीय वातावरणावर परिणाम होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने परिस्थितीची दखल घेऊन आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली.



खंडागळे यांनी राम खाडे, भाऊसाहेब लटपटे आणि मनोज चौधरी यांच्या सोशल मीडियावरील काही वक्तव्यांबाबत आक्षेप नोंदवत, संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी, असे मत व्यक्त केले. लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार असला, तरी व्यक्तीगत टीका, बदनामीकारक भाषा किंवा सामाजिक तणाव निर्माण होईल अशा प्रकारचे वक्तव्य टाळणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या आठ-दहा दिवसांपासून मतदारसंघातील सामाजिक वातावरण बिघडविण्याचा प्रयत्न होत असल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास आले असल्याचा उल्लेख त्यांनी केला. आ. सुरेश धस व त्यांच्या कुटुंबीयांविषयी सोशल मीडियावर करण्यात येणाऱ्या कथित आक्षेपार्ह वक्तव्यांबाबत प्रशासनाने योग्य ती चौकशी करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

काही व्यक्तींकडून विविध शासकीय कार्यालयांकडे तक्रारी करण्यात येत असल्याचा उल्लेख करत, त्या तक्रारींची निष्पक्ष तपासणी व्हावी तसेच कोणत्याही प्रकारचा दबाव निर्माण होत आहे का, याचाही प्रशासनाने विचार करावा, असे खंडागळे यांनी सांगितले. एखाद्या व्यक्तीविरोधात आरोप करण्यात येत असल्यास संबंधित पुरावे प्रशासनासमोर सादर करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

भाजपचे आष्टी तालुकाध्यक्ष रमेश गावडे यांनी केलेल्या आवाहनाचाही त्यांनी उल्लेख करत, संबंधितांनी सार्वजनिकरीत्या आपली भूमिका स्पष्ट करावी, असे मत व्यक्त केले.

यापुढे सामाजिक वातावरण बिघडविणाऱ्या अथवा आक्षेपार्ह स्वरूपाच्या वक्तव्यांची पुनरावृत्ती झाल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमच्या वतीने कायदेशीर व लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही खंडागळे यांनी दिला. तसेच पोलीस व महसूल प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी ग्यानबा साळवे, दिनकर वाघमारे, बाळासाहेब घाटविसावे, राम ससाणे, शहाजी सावंत, संजय पवार, शंकर निकाळजे, भगवान पालवे, मयूर शिंदे, बाळासाहेब पाटील, संतोष साखरे, विजय ससाणे, विठ्ठल ससाणे, सुनील आढागळे, निखिल ससाणे, सचिन ससाणे, किशोर खंडागळे, विश्वनाथ बर्डे, विठ्ठल गायकवाड, बाळासाहेब साखरे, अशोक अरुण, अनिल शिंदे, राहुल पवार यांच्यासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# महालक्ष्मी डेकोरेशन स्पर्धेचा भव्य निकाल सोहळा उत्साहात संपन्न

बीड (प्रतिनिधी)

अखिल भारत हिंदू महासभेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महालक्ष्मी डेकोरेशन स्पर्धेचा निकाल समारंभ शनिवार, दिनांक ३ ऑक्टोबर २०२६ रोजी याज्ञवल्क्य मंगल कार्यालय, नगर रोड, बीड येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.महिला अध्यक्षा रुपाली देशपांडे यांच्या कल्पनेने महालक्ष्मी सजावटीच्या माध्यमातून महिलांच्या कलागुणांना, सर्जनशीलतेला आणि कल्पकतेला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रत्येक सहभागी महिलेने आपल्या कल्पकतेने आणि आकर्षक सजावटीतून महालक्ष्मीचे सुंदर स्वरूप साकारले.या स्पर्धेत सौ. प्रियंका घोळवे प्रथम, सौ. अंजली धुतेकर द्वितीय, सौ. अमृता बावळे तृतीय क्रमांक पटकावले. स्पर्धेतील विजेत्या महिलांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व महिलांचे त्यांच्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल कौतुक करण्यात आले.हा कार्यक्रम सौ. रेखा सोनोने राष्ट्रीय सचिव यांनी महालक्ष्मी डेकोरेशन च्या स्पर्धा घेण्यासाठी खुप मोलाचे सहकार्य केले तसेच प्रोत्साहन दिले. महिला अध्यक्षा रूपाली जयंत देशपांडे, बीड तसेच सर्व पदाधिकारी उपाध्यक्ष सौ. भागवती परदेशी, मनीषा मुंडे, कविता बडवे, कालिका कवडे, वैशाली पुरंदरे, गीता वझे, डॉ.रूपाली



सुलाखे यांच्या उपस्थित संप्पन्न झाला.

महालक्ष्मी डेकोरेशनच्या माध्यमातून महिलांनी दाखवलेली कलात्मकता, पारंपरिक संस्कृतीशी असलेली नाळ आणि सर्जनशीलता निश्चितच कौतुकास्पद असल्याचे उपस्थित मान्यवरांनी यावेळी म्हटले. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अखिल भारत हिंदू महासभेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घेतलेल्या परिश्रमांचेही यावेळी कौतुक करण्यात आले. कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात संपन्न झाला. पुढील कार्यक्रम नवरात्री उत्सव हि असाच घेतला जाईल असे महिला अध्यक्षा रूपाली देशपांडे यांनी म्हटले.

# सोंगी भारुडातून प्रबोधनाचा जागर; विष्णू महाराज बांडे यांनी जिंकली भाविकांची मने

गेवराई (प्रतिनिधी):-माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त आयोजित कीर्तन महोत्सवात तिसऱ्या दिवशी सायंकाळच्या भक्तिमय वातावरणात भारुसम्राट विष्णू महाराज बांडे यांच्या सोंगी भारुडाचा प्रबोधनात्मक कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत विविध सोंगे सादर करत त्यांनी संत एकनाथ महाराजांच्या भारुडातून सामाजिक प्रबोधनाचा संदेश दिला.



विष्णू महाराज बांडे यांनी आपल्या प्रभावी अभिनयातून आणि विनोदी, उपरोधिक शैलीतून विविध सामाजिक विषयांवर भाष्य केले. संत एकनाथ महाराजांच्या भारुडातील आशय, लोकजीवनातील वास्तव आणि त्यातून मिळणारा प्रबोधनाचा संदेश त्यांनी आपल्या सादरीकरणातून प्रभावीपणे उलगडून दाखविला. त्यांच्या प्रत्येक सोंगाला आणि भारुडातील विविध रचनांना उपस्थित भाविक भक्तांनी उत्स्फूर्त दाद दिली.

बांडे महाराजांसह त्यांचे सहकारी हानूमान कोकणे(काळ), जालिंदर कवडे(हार्मोनियम), युवराज चौधरी (मृदंग) यांनी सादर केलेल्या विविध रचनांनी कार्यक्रमात रंगत आणली. विनोद, अभिनय, संगीत आणि प्रबोधन यांचा सुंदर मिलाफ असलेल्या या भारुड कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. संपूर्ण कार्यक्रमादरम्यान भाविक भक्त मंत्रमुग्ध होऊन भारुडाचा आनंद घेताना दिसून आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले. यावेळी अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते आणि भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड जिल्ह्यात फळपिकांसाठी हवामान आधारित पीक विमा योजना लागू

## आंबिया बहार २०२६-२७ साठी संत्रा, मोसंबी, डाळिंब, आंबा, केळी, द्राक्ष व पपईचा समावेश

बीड ।प्रतिनिधी

पुनर्रचित हवामान आधारित फळ पीक विमा योजना आंबिया बहार २०२६-२७ बीड जिल्ह्यात लागू करण्यात आली आहे. या योजनेत संत्रा, मोसंबी, डाळिंब, आंबा, केळी, द्राक्ष व पपई या सात फळपिकांचा समावेश करण्यात आला आहे. फळपिकांसाठी निश्चित करण्यात आलेले हवामान धोके उद्भवल्यास विमाधारक शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देय होणार आहे. जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी केले आहे.

ही योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित फळपिकांकरिता ऐच्छिक आहे. कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी न होण्याबाबतचे घोषणापत्र अंतिम मुदतीच्या किमान सात दिवस अगोदर संबंधित बँकेत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधित शेतकरी योजनेत सहभागी असल्याचे गृहीत धरून विमा हप्ता कर्ज खात्यातून वजा केला जाईल.

भाडेपट्टीवरील शेतकऱ्यांनाही सहभागाची संधी

अधिसूचित क्षेत्रात अधिसूचित फळपिकांची लागवड करणारे सर्व शेतकरी या योजनेस पात्र आहेत. यामध्ये कुळाने किंवा भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचाही समावेश आहे. मात्र, भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी नोंदणीकृत भाडेकरार पीक विमा संकेतस्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे.

प्रति शेतकरी एका फळपिकाखालील किमान उत्पादनक्षम क्षेत्र २० गुंठे (०.२० हेक्टर) असणे आवश्यक आहे. सर्व फळपिके व दोन्ही हंगाम मिळून प्रति शेतकरी जास्तीत जास्त ४ हेक्टर क्षेत्राची मर्यादा आहे. केवळ उत्पादनक्षम फळबागांनाच विमा संरक्षण मिळणार असून, त्यापेक्षा कमी वयाच्या फळबागांची नोंद विम्यासाठी झाल्याचे आढळल्यास विमा संरक्षण संपुष्टात येऊ शकते.

फळपिकनिहाय अंतिम मुदती

आंबिया बहार २०२६-२७ मध्ये सहभागी होण्यासाठी फळपिकनिहाय अंतिम मुदत पुढीलप्रमाणे आहे :

द्राक्ष - १४ ऑक्टोबर २०२६
मोसंबी, केळी व पपई - ३१ ऑक्टोबर २०२६
संत्रा - ३० नोव्हेंबर २०२६
आंबा - ३१ डिसेंबर २०२६
डाळिंब - १४ जानेवारी २०२७

बीड जिल्ह्यात ही योजना इफ्को टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड या विमा कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे.

विमा नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे

योजनेत सहभागी होण्यासाठी अॅग्रीस्टॅक नोंदणी, आधार कार्ड, बँक खाते तपशील, जमीनधारणा उतारा (७/१२), जिओ टॅग केलेला फोटो आदी बाबी आवश्यक आहेत. तसेच ई-पिक पाहणी / डीसीएस नोंदणी १०० टक्के असणे बंधनकारक आहे. ही नोंदणी नसल्यास विमा प्रस्ताव रद्द होऊ शकतो.

आंबिया बहारातील फळपिकांच्या विमा नोंदणीसाठी राष्ट्रीय पीक विमा संकेतस्थळ सुरू करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी संबंधित फळपिकांचे हवामान धोके, विमा संरक्षित रक्कम व भरावयाचा विमा हप्ता यांची माहिती घेऊन विहित मुदतीत जवळच्या ई-सेवा केंद्र, बँक किंवा वित्तीय संस्थेशी संपर्क साधून विमा योजनेत सहभाग नोंदवावा.

योजनेबाबतची सविस्तर माहिती कृषी विभागाचे कार्यालय, संबंधित विमा कंपनीचे कार्यालय, ई-सेवा केंद्र तसेच बँकस्तरावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता आवश्यक कागदपत्रांसह विमा योजनेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## कै. सुभाषराव नरवडे यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त इंदोरीकर महाराजांचे कीर्तन- सभापती जयदत्त अण्णा नरवडे

माजलगाव : प्रतिनिधी : कै. सुभाषराव रामराव नरवडे यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांच्या कीर्तनाचे आयोजन बुधवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. सायंकाळी ५ ते ७ या वेळेत सुलतानपूर-माळेवाडी येथील मारोती मंदिरासमोर हा कीर्तन सोहळा होणार आहे. या कार्यक्रमास परिसरातील भाविक भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे यांनी केले आहे. इंदोरीकर महाराजांच्या कीर्तनातून सामाजिक प्रबोधनासोबतच आध्यात्मिक विचारांची मेजवानी भाविकांना मिळणार आहे. कीर्तनाच्या दिवशी दुपारी १ वाजल्यापासून उपस्थितांसाठी अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. कीर्तनाची वेळ सायंकाळी ५ ते ७ अशी असून, वेळेवर सुरू होणाऱ्या या कार्यक्रमास सर्व गुणिजनांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सभापती जयदत्त अण्णा नरवडे, अशोक नरवडे, अंकुश नरवडे, डॉ. ज्ञानेश्वर नरवडे, शशिकांत नरवडे, संजय नरवडे, संतोष नरवडे, डॉ. कैलास नरवडे, डॉ. बाबासाहेब नरवडे व समस्त नरवडे परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.



## अंबाजोगाईत जनता लॉजवर पोलिसांचा छापा; अनैतिक देहविक्री रॅकेटचा पर्दाफाश, दोघांवर गुन्हा

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील बसस्थानकाजवळील जनता लॉजवर पोलिसांनी सोमवारी अचानक धाड टाकून सुरू असलेल्या देहविक्री व्यवसायाचा भांडाफोड केला. स्वतःच्या आर्थिक लाभासाठी पीडित महिलेकडून हा अनैतिक व्यवसाय करून घेणाऱ्या नारायण गुंडे आणि सचिन दुधाणी या दोघांवर अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत पोलिसांनी २७ हजार ९०० रुपयांची रोकड, मोबाईल आणि आक्षेपार्ह साहित्य जप्त केले आहे.मीरा रेडेकर यांच्या फिर्यादीवरून शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक जोगदंड पुढील तपास करत आहेत. या धडक कारवाईमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान, यापूर्वी देखील या लॉजवर अनेकदा कारवाया झालेल्या आहेत, परंतु कारवाई नंतर काही दिवसातच येथून पुन्हा अनैतिक व्यवसायांना सुरुवात करण्यात येते.

# चौकशी अहवाल आला; आता कारवाईचा फैसला कधी?

## मुख्यालयी न राहणाऱ्या शिक्षकांप्रकरणी तक्रारदार आक्रमक; अहवालाची प्रत देऊन दोषींवर कारवाईची मागणी

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये कार्यरत काही शिक्षक मुख्यालयी वास्तव्यास नसल्याच्या तक्रारीवरून गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीने आपला अहवाल गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडे सादर केला आहे. मात्र, चौकशी अहवाल सादर होऊनही त्यातील निष्कर्ष आणि पुढील कारवाईबाबत तक्रारदारांना अद्याप स्पष्ट माहिती मिळालेली नसल्याने या प्रकरणाला पुन्हा एकदा वेगळे वळण मिळाले आहे.

या पार्श्वभूमीवर पत्रकार संतोष रासवे आणि पत्रकार तथा तक्रारदार परमेश्वर सोळंके यांनी दिनांक ६ ऑक्टोबर रोजी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती माजलगाव यांच्याकडे निवेदन देत चौकशी समितीचा संपूर्ण अहवाल तक्रारदारांना उपलब्ध करून द्यावा आणि अहवालातील निष्कर्षानुसार नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

यापूर्वी शिक्षकांच्या मुख्यालयी वास्तव्याबाबत तक्रारी व निवेदने सादर करण्यात आली होती. त्यानंतर चौकशी समिती गठीत करून संबंधित शिक्षकांच्या वास्तव्याबाबत माहिती व कागदपत्रे गोळा करण्यात आली. दिनांक ५ ऑक्टोबर २०२६ रोजी गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडून निर्गमित पत्रानुसार चौकशी अहवाल कार्यालयात दाखल झाल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे.

मात्र, चौकशीत नेमके काय निष्पन्न झाले? कोण शिक्षक मुख्यालयी वास्तव्यास आहेत? कोण वास्तव्यास नाहीत? तसेच दोष आढळल्यास कोणती कारवाई प्रस्तावित अथवा शिफारस करण्यात आली? हे स्पष्ट होणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तक्रारदारांनी केवळ कागदोपत्री प्रमाणपत्रांच्या आधारे प्रकरण निकाली काढू नये, अशी भूमिका घेतली आहे. संबंधित शिक्षकांनी सादर केलेल्या वास्तव्याच्या प्रमाणपत्रांची सत्यता तपासावी, गरज भासल्यास प्रत्यक्ष स्थळपडताळणी करावी आणि चुकीची माहिती अथवा प्रमाणपत्र सादर केल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांवर नियमानुसार प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच मुख्यालयी वास्तव्याच्या नावाखाली घरभाडे भत्ता अथवा इतर शासकीय लाभ चुकीच्या पद्धतीने घेतल्याचे आढळल्यास त्याचीही चौकशी करून नियमानुसार वसुलीची कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

चौकशी झाली, अहवाल आला; आता कारवाई कधी? असा थेट सवाल उपस्थित करत तक्रारदारांनी प्रकरण प्रलंबित न ठेवता चौकशी अहवालाच्या निष्कर्षानुसार पारदर्शकपणे कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे आता गटशिक्षणाधिकारी कार्यालय या अहवालावर नेमकी कोणती भूमिका घेते आणि दोष आढळल्यास संबंधितांवर काय कारवाई होते, याकडे शिक्षक, पालक आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.माजलगाव तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये कार्यरत काही शिक्षक मुख्यालयी वास्तव्यास नसल्याच्या तक्रारीवरून गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीने आपला अहवाल गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडे सादर केला आहे.

# दुष्काळाच्या झळा भोकरदनमध्ये शेतकऱ्यांचा एल्गार

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा एसडीओ कार्यालयावर धडक मोर्चा हेक्टरी १ लाख शेतमजुरांना २५ हजारांच्या मदतीची मागणी

भोकरदन इसरारखान पठाण :-

पावसाने दिलेल्या प्रदीर्घ खंडामुळे भोकरदन आणि जाफराबाद तालुक्यातील खरीप पिकांची अक्षरशः वाताहत झाली असून शेतकरी आर्थिक संकटाच्या खाईत लोटला गेला आहे.मका, सोयाबीन,कपाशी,मूग,उडीद, ज्वारी,ऊस,फळबागा आणि पालेभाज्यांचे मोठे नुकसान झाल्याने बळीराजासमोर आता कर्जफेडीसह पुढील हंगामाचा प्रश्न उभा ठाकला आहे.या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने दुष्काळाविरोधात आक्रमक भूमिका घेत माजी आमदार चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडक दिली.

दुष्काळ जाहीर करण्याच्या घोषणेनंतर आता प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची मागणी पक्षाच्या वतीने करण्यात आली.दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये शेतमजुरांना २५ हजार रुपये थेट बँक खात्यात जमा करावेत अशी प्रमुख मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

घोषणांनी पोट भरणार नाही मदत खात्यात जमा करा

राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये २५ सप्टेंबर २०२६ रोजी दुष्काळ जाहीर करण्यात आला असला तरी केवळ सरकारी घोषणा करून शेतकऱ्यांच्या अडचणी दूर होणार नाहीत.दुष्काळ जाहीर झाला, आता मदत कधी मिळणार?असा सवाल उपस्थित करत दसरा-दिवाळीपूर्वी मदत वाटप करण्याची मागणी करण्यात आली.

शेती,फळबागा आणि महिला बचत गटांसह सर्व कर्जे माफ करावीत कृषी पंपांची वीजबिले माफ करून दिवसा १२ तास अखंड वीज द्यावी पीकविमा पीएम-किसान, दुष्काळी अनुदान,वैयक्तिक विहीर व घरकुलाचे प्रलंबित पैसे तातडीने द्यावेत अशी मागणी करण्यात आली.

चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर

दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. त्यामुळे तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात पिण्याच्या पाण्यासाठी तसेच जनावरांसाठी टँकर उपलब्ध करावेत फळबागांना टँकरद्वारे पाणी द्यावे आणि जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर सुरू करावीत अशी मागणी करण्यात आली.

रोजगार हमीची कामे गावापासून तीन किलोमीटरच्या परिसरात सुरू करून शेतकरी-शेतमजूर कुटुंबांना दर कुटुंब २५ किलो धान्य मोफत देण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची शैक्षणिक व वसतिगृह फी पूर्णपणे माफ करावी अशी मागणी करण्यात आली.भोकरदनच्या पाणीप्रश्नावरही आक्रमक भूमिका खडकपूर्णा आणि पद्मावती धरणातून भोकरदन शहराचा निर्धारित पाणीहिस्सा तातडीने उपलब्ध करून कायमस्वरूपी पाणीपुरवठा सुरू करावा अशी मागणी करण्यात आली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शहराचा पाणीप्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता असल्याने यावर तातडीने निर्णय घेण्याची मागणी पक्षाच्या वतीने करण्यात आली.



दुष्काळाच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी विधानमंडळाचे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलवावे आणि दसरा-दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या हातात मदत द्यावी अशीही मागणी करण्यात आली.

यावेळी जिल्हा सरचिटणीस संग्रामराजे देशमुख,जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण ठोंबरे, युवक तालुकाध्यक्ष नितीन शिवनकर,गटनेते शफिकशेठ पठाण,नगरसेवक नसिम पठाण,अब्दुल कदिर बापू, जयराम मुठ्ठे,रघुनाथ पंडीत, रावसाहेब दाभाडे,रामदास रोडे,गजानन वनारसे,धनराज भारती,पुंजाराम साबळे, उखाजी कोरडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# योग प्राणायामातून आनंदी जीवनाचा मार्ग

## घुंगर्डे हादगाव येथे आनंदानुभूती शिबिर उत्साहात

घुंगर्डे हादगाव।प्रतिनिधी

धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीत शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक स्वास्थ्याचीही काळजी घेणे गरजेचे आहे. योग प्राणायाम आणि ध्यानाच्या नियमित साधनेतून निरोगी शरीर शांत मन आणि आनंदी जीवनाचा अनुभव घेता येतो असे प्रतिपादन आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक माऊली दोबोले यांनी केले.

घुंगर्डे हादगाव येथील जिल्हा परिषद शाळेत आर्ट ऑफ लिव्हिंगच्या वतीने आयोजित आनंदानुभूती शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरात सहभागी साधकांना योग प्राणायाम ध्यान तसेच सुदर्शन क्रियेचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले.

दैनंदिन जीवनातील ताणतणाव चिंता आणि धावपळीतून काही वेळ स्वतःसाठी काढून नियमित साधना करणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नियमित साधनेमुळे मन शांत व सकारात्मक राहण्यास मदत होते. तसेच जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक आणि आनंददायी होतो, असे मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिरात आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक माऊली दोबोले आणि अशोक हरिचंद्रे यांनी मार्गदर्शन केले. घुंगर्डे हादगाव तसेच परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध योग प्राणायाम व ध्यानाच्या क्रियांचा अनुभव घेतला.निरोगी शरीर शांत मन आणि आनंदी जीवनासाठी योग व ध्यानाची नियमित साधना करण्याचा संदेश या शिबिरातून देण्यात आला.

# पैठणमध्ये श्री कालिका देवी नवरात्र उत्सवाची जोरदार तयारी; नव्या महिला समितीची घोषणा!

पैठण (विशेष प्रतिनिधी):

दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ऐतिहासिक पैठण शहरातील रंगारहाट्टी गल्ली येथील प्रसिद्ध सर्वांचे आराध्य दैवत 'श्री कालिका देवी नवरात्र उत्सव २०२६' ची नवी महिला कार्यकारिणी नुकतीच सर्वानुमते जाहीर करण्यात आली आहे. यंदाचा नवरात्रोत्सव सामाजिक प्रबोधन, महिला सक्षमीकरण आणि विविध कला-सांस्कृतिक उपक्रमांनी भव्य स्वरूपात साजरा करण्याचा संकल्प मंडळाने सोडला आहे.

या वर्षीच्या उत्सव समितीच्या अध्यक्षपदी पुनम जैस्वाल तर उपाध्यक्षपदी पूजा असोलकर यांची निवड करण्यात आली आहे. मंडळाच्या इतर प्रमुख पदाधिकाऱ्यांची यादी खालीलप्रमाणे:सचिव: अश्विनी ठोंबरे



। सहसचिव: रंजीता दायमा कोषाध्यक्ष: श्रद्धा रावस । सहकोषाध्यक्ष: प्रीती कुलकर्णी, वैशाली खीस्ती स्पर्धा प्रमुख: स्वाती साळुंके । स्पर्धा उपाध्यक्ष: कोमल तरटे दांडिया प्रमुख: पायल ठोंबरे, कल्पना परागे, अश्विनी लोंढे, सुवर्णा सारडा, भारती जव्हेरी, संगीता आखेगावकर स्वागत प्रमुख: राणी गोजरे, संगीता चौधरी, स्वाती भारदे, अंकिता सराफ, स्वाती जाधव छायाचित्र व प्रसिद्धी समिती: सीमा मुळे, पूजा सराफ, कल्पना बीचुकले,रुपाली मोदाणी आरती नियोजन प्रमुख: राणी रावस, गीतांजली रावस, यामिनी सराफयंदाच्या नवरात्रोत्सवात महिलांसाठी विशेष प्रबोधनात्मक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धा, आणि पारंपरिक गरबा-दांडियाचे भव्य आयोजन करण्यात येणार आहे. श्री कालिका देवीच्या दर्शनासाठी आणि उत्सवातील विविध कार्यक्रमांचा लाभ घेण्यासाठी शहरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नवनिर्वाचित महिला समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# दावरवाडी दुष्काळग्रस्त भागाचा रासप नेते महादेव जानकर यांनी घेतला आढावा

## हेक्टरी ५० हजार मदतीसाठी मुख्यमंत्र्यांना निवेदन देणार

दावरवाडी ।प्रतिनिधी

रासपचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी मंत्री महादेव जानकर यांनी आज दावरवाडी, नानेगाव, रहाटगाव परिसरातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला. या भागातील दुष्काळाची भीषण परिस्थिती पाहून हे संपूर्ण नुकसान भरपाई पत्राद्वारे मुख्यमंत्री महोदयांना सादर करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

सकाळी १० वाजता त्यांच्या संवाद दौऱ्याला सुरुवात झाली. दावरवाडी, नानेगाव आणि रहाटगाव या तीनही गावांमध्ये त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली. पावसाअभावी सोयाबीन, तुर कापूस, बाजरी मका पिके करपून गेली असून शेतकरी हवालदिल झाला आहे.यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधताना जानकर म्हणाले की, शेतकऱ्याला या संकटातून बाहेर काढण्यासाठी सरकारने तातडीने हेक्टरी ५० हजार रुपये प्रमाणे मदत जाहीर करावी. तसेच पिक विमा, चारा



छावण्या आणि पिण्याच्या पाण्याची तात्काळ व्यवस्था करावी. यावेळी उपस्थिती अजित पाटील माऊली सलगर प्रकाश दिलवाले जिल्हाध्यक्ष कृष्णा जाधव भाऊसाहेब सोनवणे संतोष सोनवणे अशोक सरगर शिवाजी जाधव रामेश्वर सोरमारे दत्ता चोरमारे दत्ता दिवटे चोरमले मिठू नन्नवरे गोपाल धारे शेखर धारे अंबादास खोलासे किशोर डोईफोडे यांची या दौऱ्यावेळी परिसरातील शेकडो शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांच्यासमोर मांडल्या.पैठण तालुक्यातील दावरवाडी राडगाव नानेगाव सर्व परिसरात व भागातील दुष्काळाची परिस्थिती अतिशय गंभीर आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आहे. या सर्व परिस्थितीचा अहवाल मी स्वतः मुख्यमंत्र्यांना भेटून देणार असून शेतकऱ्याला हेक्टरी ५० हजार रुपये मदत मिळवून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.

# वाण धरणातील अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी प्रशासनाची कठोर पावले

## ७ अधिकारी ठेवणार २४ तास करडी नजर

परळी / प्रतिनिधी

हवामान विभागाने वर्तवलेला 'अलनिनो'चा धोका आणि त्यामुळे संभाव्य पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाने आतापासूनच कठोर उपाययोजना राबविण्यास सुरुवात केली आहे. जलसाठ्यांचे संरक्षण आणि पाण्याचा अनधिकृत उपसा रोखण्यासाठी वाण धरणावर आता ७ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे विशेष पथक तैनात करण्यात आले असून, हे पथक सलग २४ तास धरणावर करडी नजर ठेवणार आहे. बीडचे जिल्हाधिकारी आणि परळी वैजनाथचे उपविभागीय अधिकारी यांच्या सूचनेनुसार दिनांक ५ ऑक्टोबर २०२६ रोजी यासंदर्भातील अधिकृत आदेश जारी करण्यात आले आहेत.हवामान विभागाने अलनिनो समुद्र प्रवाह परिस्थितीमुळे यंदा सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान होण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे भविष्यात गंभीर पाणीटंचाई निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने आतापासूनच नियोजन सुरू केले आहे.

जलसाठ्यामधील पिण्याचे पाणी, शेती व इतर तातडीच्या गरजांसाठी उपलब्ध असलेल्या जलसाठ्याचे प्रभावी नियंत्रण करणे आवश्यक बनले आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीने किंवा संस्थेने अनधिकृतपणे पाणी उपसा करू नये, असे स्पष्ट निर्देश प्रशासनाने दिले आहेत. पाण्याचा अवैध उपसा रोखणे आणि जलसाठ्यांचे संरक्षण करणे अत्यावश्यक असल्याने, प्रशासनाने 'नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५' अंतर्गत हे प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. विशेषतः वाण धरणातील पाण्यावर लक्ष ठेवण्यासाठी ७ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, ते दररोज २४ तास या जलसाठ्यावर कडक पहारा देणार आहेत.

प्रशासनाच्या या निर्णयामुळे पाण्याचा गैरवापर करणाऱ्यांवर आणि अनधिकृतपणे पाणी उपसा करणाऱ्यांवर मोठा वचक बसणार आहे. तसेच, नागरिकांनीही पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करावा, असे आवाहन महसूल विभागाकडून करण्यात आले आहे.

# टाईप रायटिंग परीक्षेत यशराज औताडे सर्वप्रथम

### ९४.५% गुण घेऊन अंबाजोगाईतून प्रथम क्रमांक; एकाच वेळी चार परीक्षा देत मिळविले घवघवीत यश



अंबाजोगाई ।प्रतिनिधी

येथील यशराज नागेश औताडे यांनी टाईप रायटिंग परीक्षेत ९४.५% गुण मिळवून अंबाजोगाईतून सर्वप्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यांनी एकाच वेळी मराठी ३०, मराठी ४०, इंग्रजी ३० आणि इंग्रजी ४० अशा चारही टाईप रायटिंग परीक्षा दिल्या आणि उल्लेखनीय कामगिरी केली.यशराज औताडे हे 'योगेश्वर दर्शन न्यूज चैनल'चे संपादक तथा पत्रकार नागेश औताडे यांचे सुपुत्र आहेत. सध्या ते बी.एस्सी. द्वितीय वर्षात शिक्षण घेत असून, महाविद्यालयीन शिक्षणासोबतच टाईप रायटिंगचा सराव करत त्यांनी हे यश संपादन केले आहे.

सातत्यपूर्ण सराव, मेहनत, जिद्द आणि अचूक टायपिंगच्या जोरावर यशराज यांनी ९४.५% गुणांची उत्कृष्ट कामगिरी करत अंबाजोगाईतून सर्वप्रथम येण्याचा मान मिळविला. एकाच वेळी चार परीक्षा देऊन मिळविलेले हे यश विशेष कौतुकास्पद मानले जात आहे.यशराज यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल मराठी पत्रकार परिषद शाखा अंबाजोगाई, अंबाजोगाई पत्रकार संघ आणि गोल्डन आरोग्य फॅमिली यांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. त्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी विविध स्तरातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.महाविद्यालयीन शिक्षणासोबत कौशल्यविकासावर भर देत यशराज यांनी मिळविलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरले आहे.

# हरवलेली सेवा पुस्तिका युवकांच्या प्रामाणिकपणामुळे मिळाली

## सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या शिक्षकाला मोठा दिलासा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

बर्दापूर मार्गे जवळगाव, गित्ता ते अंबाजोगाई असा प्रवास करत असताना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लिंबगाव तांडा येथील सहशिक्षक बालाजी कोंडीबा म्हेत्रे यांची मूळ सेवा पुस्तिका (सर्विस बुक) हरवली होती. या संदर्भातील माहिती समाजमाध्यमांवरील विविध ग्रुपवर प्रसारित करण्यात आली होती.

दरम्यान, जवळगाव येथील महेश प्रभाकर धायगुडे व सत्यम भरत भाटणकर या दोन युवकांना दस्तगीरवाडी ते गित्ता दरम्यान रस्त्यावर सदर सेवा पुस्तिका आढळून आली. सेवा पुस्तिकेचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांनी ती स्वतःकडे न ठेवता संबंधितांपर्यंत पोहोचविण्याचा निर्णय घेतला.

दोन्ही युवकांनी सेवा पुस्तिका व त्यातील कागदपत्रे अंबाजोगाई तहसील कार्यालयात आणून तहसीलदार विलासजी तरंगे, नायब तहसीलदार सचिन देशपांडे, नायब तहसीलदार मिलिंद गायकवाड, नगरपरिषद स्वच्छता विभाग प्रमुख अनंत वेडे, लिंबगाव तांडा शाळेतील सहशिक्षक शेख मेहराज तसेच सहशिक्षक बाळासाहेब माने यांच्या उपस्थितीत सुपूर्द केली.

विशेष म्हणजे, सहशिक्षक बालाजी कोंडीबा म्हेत्रे हे येत्या डिसेंबर महिन्यात सेवानिवृत्त होणार असून, त्यांच्या सेवेशी संबंधित हा अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज आहे. त्यामुळे सेवा पुस्तिका परत मिळाल्याने त्यांना मोठा दिलासा मिळाला.

यावेळी महेश धायगुडे आणि सत्यम भाटणकर यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करत उपस्थितांच्या हस्ते त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

शिक्षक शेख मेहराज यांनीही दोन्ही युवकांच्या प्रामाणिकपणाचे आणि सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले.हरवलेली महत्त्वाची कागदपत्रे परत करण्यासाठी पुढाकार घेत दोन्ही युवकांनी दाखविलेल्या प्रामाणिकपणामुळे माणुसकी आणि सामाजिक जबाबदारीचा आदर्श निर्माण झाला आहे.बर्दापूर मार्गे जवळगाव, गित्ता ते अंबाजोगाई असा प्रवास करत असताना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लिंबगाव तांडा येथील सहशिक्षक बालाजी कोंडीबा म्हेत्रे यांची मूळ सेवा पुस्तिका (सर्विस बुक) हरवली होती. या संदर्भातील माहिती समाजमाध्यमांवरील विविध ग्रुपवर प्रसारित करण्यात आली होती.

# ग्रामसेवकाविरोधात शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार

सोन्नाथडी येथील ६२ वर्षीय शेतकऱ्याची माजलगांव ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार

माजलगांव (प्रतिनिधी) तालुक्यातील सोन्नाथडी येथील ६२ वर्षीय शेतकरी सतीश मारोतीराव देवगुंडे यांनी फोनवरून शिवीगाळ करून जीवे मारण्याची तसेच अ‍ॅट्रॉसिटीची धमकी दिल्याचा आरोप करत ग्रामसेवक रामदास सखाराम तपसे यांच्याविरोधात माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, रामदास सखाराम तपसे, रा. सोन्नाथडी, ता. माजलगाव, जि. बीड, ग्रामसेवक, जिल्हा परिषद धाराशिव (हल्ली मुक्काम धाराशिव) यांनी रविवार, दि. ०४ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री सुमारे १०.०८ वाजताआपल्या मोबाईलवरून सतीश देवगुंडे यांच्या मोबाईलवर फोन केला.यावेळी न्यायालयीन प्रकरणातील सौ. अनुराधा रामदास तपसे यांच्याकडून पैसे भरण्याच्या तारखेच्या कारणावरून संभाषण झाले. या संभाषणादरम्यान आपल्याला शिवीगाळ करण्यात आली तसेच जीवे मारण्याची आणि अ‍ॅट्रॉसिटी करण्याची धमकी देण्यात आल्याचा आरोप सतीश देवगुंडे यांनी पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत केला आहे.

सतीश देवगुंडे हे सोन्नाथडी शिवारात कुटुंबासह वास्तव्यास असून शेती व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. या घटनेनंतर त्यांनी सोमवार, दि. ०५ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५:१५ वाजता माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात हजर राहून तक्रार दिली.

या प्रकरणी गुरनं. ४३४/२०२६अंतर्गत भारतीय न्याय संहितेतील नमूद कलमांनुसार नोंद करण्यात आल्याचे तक्रारीच्या कागदपत्रात नमूद आहे. तक्रारीत करण्यात आलेल्या आरोपांची सत्यता तपासण्याची प्रक्रिया पोलिसांकडून केली जाणार आहे.



दरम्यान, ग्रामसेवकाविरोधात करण्यात आलेल्या या तक्रारीमुळे सोन्नाथडी परिसरात चर्चेला उधाण आले असून, या प्रकरणात पोलिसांकडून पुढील कायदेशीर कारवाई काय होते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# दुष्काळाच्या पाहणीसाठी केंद्राची तीन पथके महाराष्ट्रात दाखल..

## मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांतील दुष्काळसदृश भागांची 'ऑन फिल्ड' पाहणी, मदतीच्या निर्णयासाठी अहवाल महत्त्वाचा

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी

महाराष्ट्रातील दुष्काळसदृश परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक उपाययोजनांना गती देण्यासाठी केंद्र सरकारची तीन आंतरमंत्रालयीन पथके गुरुवार, दि. ८ ऑक्टोबरपासून महाराष्ट्राच्या विविध भागांचा दौरा करणार आहेत. ८ ते १० ऑक्टोबर दरम्यान पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील पर्जन्यतूटग्रस्त व दुष्काळसदृश भागांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येणार आहे.

या पाहणी दरम्यान पिकांची स्थिती, पर्जन्यमानातील तूट, पावसातील खंड, भूजलपातळीतील घट तसेच पिण्याच्या पाण्याची उपलब्धता याचा प्रत्यक्ष आढावा घेतला जाणार आहे. केंद्राच्या पथकांच्या अहवालाच्या आधारे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत महाराष्ट्राला मदत देण्याबाबत पुढील निर्णय होणार आहे.

**मुख्यमंत्र्यांकडून अमित शाह यांना दुष्काळाची माहिती..**

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्ली दौऱ्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन राज्यातील गंभीर दुष्काळी परिस्थितीची माहिती दिली. राज्यातील सुमारे ३२ जिल्ह्यांमध्ये दुष्काळाची गंभीर परिस्थिती असून जवळपास ८० टक्के तालुके बाधित असल्याचे मुख्यमंत्र्यांनी निदर्शनास आणून दिले. केंद्र सरकारकडून विशेष मदतीची मागणी करताना राज्य सरकारने पाठविलेल्या प्रस्तावाची आगाऊ प्रतही त्यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांना दिली.

केंद्रीय पथकाच्या प्रत्यक्ष पाहणीसह राज्याने सादर केलेला प्रस्ताव विचारात घेऊन मदतीबाबत निर्णय घेतला जाणार आहे. केंद्र सरकार महाराष्ट्राच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहील आणि जास्तीत जास्त मदत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन अमित शाह यांनी दिल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**मराठवाड्यात बीडसह तीन जिल्ह्यांची पाहणी..**

मराठवाड्यासाठी नियुक्त करण्यात आलेले केंद्रीय पथक छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांतील पर्जन्यतूटग्रस्त आणि दुष्काळसदृश भागांची पाहणी करणार आहे. ९ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील विविध भागांचा आढावा घेतल्यानंतर पथक बीड जिल्ह्यात दाखल होणार आहे. १० ऑक्टोबर रोजी बीड जिल्ह्यातील आणखी काही भागांची प्रत्यक्ष पाहणी करून जिल्हाधिकारी तसेच संबंधित अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेण्यात येणार आहे.

**पिकांचे नुकसान, भूजल आणि पाणीटंचाईचा होणार आढावा**

केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासोबत झालेल्या चर्चेचा संदर्भ देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, दुष्काळाचे मूल्यांकन करताना केवळ उपग्रह प्रतिमांचा निकष न वापरता पावसातील खंड, भूजलपातळी, पिकांचे नुकसान आणि प्रत्यक्ष पाहणी यांचाही विचार केला जाणार आहे. त्यामुळे उपग्रह निकषात न बसणारे, मात्र इतर निकषांवर पात्र ठरणारे तालुकेही मदतीच्या कक्षेत येऊ शकतील.

**राज्य सरकारकडूनही तातडीच्या मदतीची तयारी..**

केंद्राकडून मदत मिळण्यास काही कालावधी लागू शकतो. त्यामुळे राज्य सरकार आपल्या उपलब्ध संसाधनांतून शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याच्या तयारीत आहे. राज्यातील सुमारे २३ हजार गावांमध्ये काही पिकांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून उर्वरित सर्वेक्षणाची कार्यवाही वेगाने सुरू आहे.

दरम्यान, केंद्रीय पथकांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर ८ ऑक्टोबर रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत उच्चस्तरीय बैठक होणार आहे. पर्जन्यमानातील तूट, कोरडा कालावधी, पिकांचे नुकसान, भूजलपातळी आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई याबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात येणार आहे.

केंद्रीय पथकाच्या प्रत्यक्ष पाहणीमुळे मराठवाड्यासह बीड जिल्ह्यातील दुष्काळाची वस्तुस्थिती केंद्रासमोर स्पष्टपणे मांडली जाणार असून, शेतकरी व ग्रामीण जनतेला मिळणाऱ्या मदतीच्या दृष्टीने हा दौरा महत्त्वाचा ठरणार आहे.




# आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नाने आष्टी ग्रामीण रुग्णालयात तीव्र हार्ट अटॅक वरील उपचार पद्धतीचा शुभारंभ

## ५३ हजार रु.किंमतीचे इंजेक्शन होणार मोफत उपलब्ध

आष्टी - (एस.राजेंद्र लाड)

आमदार सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने आष्टी ग्रामीण रुग्णालयामध्ये तीव्र हार्ट अटॅक आल्यानंतर द्यावयाचे इंजेक्शन उपलब्ध झाले असून आणि उपचाराचे संयंत्र कार्यान्वित करण्यात आले आहे. अशा पद्धतीचे उपचार करणारे ग्रामीण रुग्णालय बीड जिल्ह्यात एकमेव रुग्णालय ठरले आहे.

काल दि. ७ ऑक्टोबर रोजी ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. त्यावेळी नगराध्यक्ष जिया बेग, माजी सभापती आदिनाथ सानप, रुग्णकल्याण समिती सदस्य प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, सनियंत्रण समिती सदस्य जालिंदर पोकळे उपस्थित होते. यावेळी अधिक माहिती देताना ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामदास मोराळे म्हणाले की, एखाद्या व्यक्तीला तीव्र हार्ट अटॅक आल्यास या उपचार पद्धतीने रक्ताच्या गुठळ्या पातळ करण्यात येतात. तीव्र हार्ट अटॅक असल्यामुळे सुरुवातीच्या एक तासात अशा पद्धतीचा उपचार दिल्यास पेशंट जगू शकतो. या उपचार पद्धतीमध्ये एक इंजेक्शन उपलब्ध करून देण्यात आले असून त्याची बाजारी किंमत ५३ हजार रुपये आहे, परंतु ते ग्रामीण रुग्णालयामध्ये मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहे. तीव्र हार्ट अटॅकचा रुग्ण दाखल झाल्यानंतर त्याची तपासणी करून थ्रोंबोलायसिस पद्धतीने उपचार करून डीफॅब्रिलेटर, सिरीज पंप इत्यादी व्यवस्था कार्यान्वित करण्यात आली असून यासाठी स्वतंत्र कक्ष आणि स्वतंत्र बेड उपलब्ध करून देण्यात आले आहे. या पद्धतीने उपचार करण्यासाठी ग्रामीण रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी आणि स्टाफ नर्सेस या सर्वांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यामुळे हार्ट अटॅक सदृश्य लक्षणे दिसून येत असलेल्या रुग्णांनी आणि त्याच्या नातेवाईकांनी तात्काळ ग्रामीण रुग्णालयाकडे संपर्क करावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले आहे.



# शिक्षकांनी उपक्रमशीलतेतून गुणवत्ता जपावी – माजी शिक्षण संचालक गोविंद नांदेडे

मुंबई प्रतिनिधी

कल्याणम् एज्यूकेअर पुणे तर्फे आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा ०२/१०/२०२६ रोजी मुंबई मराठी पत्रकार संघ आझाद मैदान मुंबई येथील सभागृहात पार पडला.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून मुंबई महानगर पालिका उपमहापौर संजय घाडी साहेब, प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्याचे माजी शिक्षण संचालक गोविंद नांदेडे साहेब आणि प्रमुख पाहुणे म्हणून मीरा भाईंदर महापालिकेच्या माजी महापौर श्रीमती निर्मलाताई सावळे तर शिक्षण प्रेमी महाराष्ट्राचे चीफ इंजिनियर साहेबराव सुरवसे, ज्येष्ठ शिक्षक शिवाजीराव कांडेकर सर, सिनेअभिनेत्री दिव्यांशी डे यांची विशेष उपस्थिती होती.संजय घाडी यांनी भ्रमण ध्वनीवरून शुभेच्छ्या दिल्या तर इतर मान्यवरांनी उपस्थिताना मार्गदर्शन करून महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील ७५ उपक्रमशील आदर्श शिक्षक शिक्षकांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अँड. कल्याण नेहरकर यांनी केले तर सूत्र संचालन सुभाषराव पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी संपत मुरकुटे, सवदे सर, बंडू आघाव सर, भगवान नेहरकर यांनी नियोजन केले.

# धमकीच्या सावटाखाली लोकशाहीचा आवाज; भोकरमध्ये भीतीचे राजकारण तर नाही ना?

## नगरसेवक जटालवार यांना जीवे मारण्याची धमकी; गुन्हा दाखल, राजकीय दबावाने खळबळ!

भोकर ( प्रतिनिधी ) लोकशाहीत मतभेद असू शकतात, राजकीय संघर्ष होऊ शकतो; परंतु एखाद्या लोकप्रतिनिधीच्या विरोधाला उत्तर देताना जर धमकी, शिवीगाळ अथवा दहशतीचा आधार घेतला जात असल्याचे पुढे येत असेल, तर हा केवळ एका व्यक्तीचा प्रश्न राहत नाही. तो थेट लोकशाहीच्या आरोग्याशी जोडलेला गंभीर विषय ठरतो. भोकर शहरात नगरसेवक साईप्रसाद सूर्यकांत जटालवार यांनी दिलेल्या तक्रारीनंतर नोंदविण्यात आलेल्या गुन्हा मुळे अशाच अनेक प्रश्नांना पुन्हा वाचा फुटली आहे.

पोलीस नोंदीनुसार, ५ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री सुमारे ८.४५ वाजता भोकर येथील नगरसेवक जटालवार यांच्या कार्यालयासमोर एका हुंदाई क्रेटा वाहनातून तीन ते चार अनोळखी व्यक्ती आल्याचे तक्रारीत नमूद आहे. कार्यालयातील कर्मचाऱ्याला नगरसेवकांविषयी विचारणा करून, शिवीगाळ व गंभीर परिणामांची जिवे मारण्याची धमकी देण्यात आलि आहे. या घटनेबाबत ६ ऑक्टोबर रोजी भोकर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५२, ३५१(२), ३५१(३) आणि ३(५) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आली आहे.या प्रकरणातील सर्वांत गंभीर बाब म्हणजे विरोध केला तर जिवे मारू अशा आशयाची धमकी दिल्याचा तक्रारदाराचा दावा आहे मात्र,लोकप्रतिनिधी ला त्याच्या राजकीय किंवा प्रशासकीय भूमिकेमुळे धमकावले जात असल्याची तक्रारच जर पोलीस दप्तरी नोंदली जात असेल, तर प्रशासनाने त्याकडे केवळ कागदोपत्री तक्रार म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही.नगर परिषद प्रशासनातील कथित अनियमितता आणि बेकायदेशीर कामां विरोधात आपण यापूर्वी तक्रारी तसेच न्यायालयीन प्रक्रिया सुरू केल्याचे नगरसेवक जटालवार यांनी आपल्या जबाबात नमूद केले आहे. याच पार्श्वभूमीवर धमकीचा प्रकार घडल्याचा त्यांचा दावा आहे. त्यामुळे या घटनेचा तपास करताना धमकी देणारे नेमके कोण, वाहन कोणाच्या नावावर आहे, संबंधित व्यक्ती घटनास्थळी का आल्या, त्यांचा कोणाशी संपर्क होता आणि घटनेमागे कोणाचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध आहे का, याचा वस्तुनिष्ठ तपास होणे आवश्यक आहे. राजकारणाच्या विचारांचा पराभव विचारांनी झाला पाहिजे; धमकीने नव्हे. प्रशासनावर प्रश्न उपस्थित करणाऱ्या लोकप्रतिनिधीला भीती दाखवून गप्प करण्याची प्रवृत्ती वाढत असेल, तर त्याचा परिणाम केवळ एका व्यक्तीवर होत नाही– सामान्य नागरिकही प्रश्न विचारण्यापासून मागे हटतो.आणि ज्या क्षणी नागरिक प्रश्न विचारणे थांबवतो, त्या क्षणी लोकशाही कमकुवत होण्यास सुरुवात होते.या प्रकरणात पोलिसांनी निष्पक्ष तपास करून सत्य जनतेसमोर आणणे गरजेचे आहे. तक्रारदाराचा आरोप खरा असल्यास दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे; राजकीय दबाव कोणत्याही दिशेने असो, कायद्यापेक्षा मोठा असू शकत नाही.भोकरची ओळख शांतताप्रिय शहर म्हणून आहे. ही शांतता राजकीय दहशतीच्या सावटाखाली येऊ नये, एवढीच अपेक्षा. लोकशाहीत विरोधक असतात, शत्रू नाहीत. मतभेद असतात, वैर नव्हे. भोकरच्या राजकीय संस्कृतीला धमकीची भाषा नको; संवादाची, कायद्याची आणि संविधानिक मूल्यांची भाषा हवी.

# गेवराई तालुक्यात चारा टंचाईचे संकट; तातडीने चारा छावण्या किंवा चारा डेपो सुरु करा

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चारा व पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली असून, प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तालुक्यातील आवश्यक गावांमध्ये तातडीने चारा छावण्या अथवा शासकीय चारा डेपो सुरू करावेत, अशी मागणी गेवराई नगर परिषदेचे सदस्य श्री. आप्पासाहेब कानगुडे यांनी केली आहे.

या मागणीसाठी कानगुडे यांनी दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी तहसील कार्यालय, गेवराई येथे तहसीलदार यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर केले.गेवराई तालुक्यात अपुरा पाऊस, शेतीचे नुकसान आणि उपलब्ध चाऱ्याचे घटते प्रमाण यामुळे शेतकरी व पशुपालकांसमोर जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होत आहे. चारा व पशुखाद्याच्या वाढत्या किंमतीमुळे पशुपालकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असून, वेळीच उपाययोजना न झाल्यास पशुधनाच्या चारा व पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने गावनिहाय जनावरांची संख्या व उपलब्ध चाऱ्याचा तातडीने सर्वेक्षण करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. ज्या गावांमध्ये चारा टंचाई गंभीर आहे, त्या गावांमध्ये तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात. ज्या ठिकाणी छावणी सुरू करणे शक्य नसेल, त्या ठिकाणी शासकीय चारा डेपो किंवा चारा वाटप केंद्र सुरु करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

तसेच पशुपालकांना शासनाच्या नियमानुसार पुरेसा चारा उपलब्ध करून देण्याबरोबरच जनावरांसाठी आवश्यक पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र व्यवस्था करावी. तालुक्यातील परिस्थितीचा वस्तुनिष्ठ अहवाल तयार करून आवश्यक निधी व चारा उपलब्ध करण्यासाठी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे तातडीने प्रस्ताव पाठवावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

शासनस्तरावरही पाठपुरावा

गेवराई तालुक्यातील शेतकरी व पशुपालकांचा प्रश्न केवळ तहसील पातळीपुरता मर्यादित न ठेवता तो शासनस्तरावर मांडण्यात येणार आहे. यासाठी मुख्यमंत्री, महसूल मंत्री, पशुसंवर्धन मंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री तसेच नैसर्गिक आपत्ती/आपत्ती व्यवस्थापन विभागातील संबंधित अधिकारी व सचिव यांना ई-मेलद्वारे निवेदनाची प्रत पाठवून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे नगरसेवक आप्पासाहेब कानगुडे यांनी सांगितले.

चारा वितरणात पारदर्शकतेची मागणी

चारा छावणी किंवा चारा डेपो सुरू झाल्यानंतर चारा वितरणामध्ये पारदर्शकता ठेवावी. लाभार्थी पशुपालकांची तसेच जनावरांची योग्य नोंद ठेवावी, जेणेकरून शासनाकडून उपलब्ध होणारा चारा गरजू शेतकरी व पशुपालकांपर्यंत योग्य पद्धतीने पोहोचेल, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

गेवराई तालुक्यातील शेतकरी व पशुपालकांचे पशुधन वाचविण्याच्या दृष्टीने हा अत्यंत तातडीचा विषय आहे. प्रशासनाने परिस्थितीची पाहणी करून विलंब न करता आवश्यक गावांमध्ये चारा छावण्या अथवा चारा डेपो सुरू करण्याबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी नगरसेवक आप्पासाहेब कानगुडे यांनी केली आहे. :



श्री. आप्पासाहेब कानगुडे सदस्य, गेवराई नगर परिषदगेवराई, जि. बीड
मो. ९६७३०६३३९३

## प्रेमसंबंधाचा संशय: लातूरच्या प्राध्यापकाचा बर्दापूर जवळच्या

# खडी केंद्रावर बेदम मारहाण करून खून, चौघांवर गुन्हा दाखल

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

लातूर शहरातील कन्हेरी चौक भागातून एका प्राध्यापकाचे अपहरण करून एका महिलेशी असलेल्या प्रेमसंबंधाच्या संशयावरून त्याला अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथील खडी केंद्रावर आणून बेदम मारहाण करत निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. कोल्हापूर येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले माधव ऊर्फ नितीन धनाजी संगमे (वय ३२) असे मयत तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी शिवाजी नगर पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध अपहरण आणि खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अपहरण करून खडी केंद्रावर बेदम मारहाण

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत माधव संगमे हे आपल्या लहान भावाच्या साखरपुड्याच्या तयारीसाठी गावी आले होते. रविवारी दुपारी त्यांना फोन करून विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात बोलावून घेण्यात आले. त्यानंतर आरोपी पृथ्वीराज देशमुख, धवल देशमुख, प्रथमेश रेड्डी आणि आदित्य भालके (सर्व रा. लातूर) यांनी त्यांचे चारचाकी वाहनातून अपहरण केले. एका महिलेसोबत प्रेमसंबंध असल्याच्या संशयावरून आरोपींनी माधवला बर्दापूर येथील खडी केंद्रावर नेले. तेथे त्याला लोखंडी रॉड, बेल्ट आणि काठ्यांनी अमानुष मारहाण केली.

रुग्णालयात बनाव फसला

गंभीर मारहाणीत माधव बेशुद्ध पडल्यानंतर आरोपी आदित्य भालके याने त्याला लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल केले. डॉक्टरांनी तपासणी करून माधवला मृत घोषित केले. सुरुवातीला बर्दापूरजवळ हा तरुण जखमी अवस्थेत सापडल्याचा बनाव आरोपीने रचला, मात्र रुग्णालयात उपस्थित असलेल्या पोलिसांनी संशयावरून चौकशी करताच संपूर्ण धक्कादायक प्रकार समोर आला. मयताचा लहान भाऊ नरेंद्र संगमे याच्या फिर्यादीवरून शिवाजी नगर पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलमांनुसार चौघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला असून पोलीस निरीक्षक संतोष पाटील पुढील तपास करत आहेत.



# माणूस देहाला सांभाळतो, आत्म्याला विसरतो - ह.भ.प. श्रीरामबुवा रामदासी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

माणूस आयुष्यभर देहाचे लाड करतो. पण देहात बसलेल्या आत्म्याकडे कधी पाहतच नाही. असे अध्यात्मिक सत्य ह.भ.प. श्रीरामबुवा रामदासी (बिटरगांवकर) महाराजांनी झालेल्या कीर्तनातून भाविकांना समजावून सांगितले. येथील ब्राम्हण संघटन यांच्या वतीने आयोजित कीर्तन महोत्सवात तिसरे पुष्प गुंफताना ह.भ.प. श्रीरामबुवा रामदासी (बिटरगांवकर) महाराज बोलत होते. त्यांनी आपल्या कीर्तनात

संत वेण्णास्वामींच्या बंध विमोचन राम माझा या अभंगावर निरूपण करताना त्यांनी अध्यात्म म्हणजे काय, याची सोप्या भाषेत उकल केली.अहंकार सोडा, आत्मारामाला भेटा. हि वेण्णास्वामींच्या अभंगातून अध्यात्माची शिकवण त्यांनी सांगितली. आपण शरीर नाही, मन नाही, आपण त्या दोहोंना चालवणारा आत्माराम आहोत. जोपर्यंत 'मी' पणाचा अहंकार आहे, तोपर्यंत बंधन आहे.सद्गुरू कृपया ओळखीला डोळस डोळ्यांना आरसा लागतो.तसा आत्म्याला ओळखण्यासाठी सद्गुरू लागतो. ग्रंथ वाचून ज्ञान मिळेल, पण आत्मज्ञान गुरुकृपेनेच मिळते.असे त्यांनी सांगितले. या कीर्तनात तबल्यावर केदार दामोशन यांनी तर हार्मोनियम वर विश्वजित धाट यांनी साथसंगत केली.

# बीड जिल्ह्यात रेशीम उद्योगाला मिळणार मोठी चालना

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय आढावा बैठकीतून 'पोखरा २.०' अंतर्गत तुती लागवड व शेड उभारणीला मिळणार बळकटी

बीड ।प्रतिनिधी

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आर्थिक समृद्धीसाठी तसेच शेतीपूरक व्यवसायांना चालना देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने रेशीम उद्योगाच्या विकासासाठी पुढाकार घेतला आहे. ग्लोबल विकास ट्रस्ट या संस्थेच्या माध्यमातून जिल्ह्यात रेशीम शेतीचा विकास व विस्तार करण्यासाठी समन्वय करार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

'पोखरा २.०' योजनेचे प्रभावी अभिसरण

शासनाच्या महत्त्वाकांक्षी नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (पोखरा २.०) अंतर्गत रेशीम उद्योगाशी संबंधित विविध घटकांना जिल्ह्यात गती देण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने शाश्वत उत्पन्नाचा स्रोत असलेल्या तुती लागवडीला प्रोत्साहन, तुती पाला संवर्धनासाठी आवश्यक असलेल्या दर्जेदार शेडची उभारणी तसेच रेशीम कीटक संगोपनाशी संबंधित आधुनिक सुविधांचा समावेश आहे.

या उपक्रमामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पारंपरिक शेतीसोबत रेशीम शेती हा फायदेशीर शेतीपूरक व्यवसाय म्हणून उपलब्ध होण्याचा मार्ग सुकर होणार आहे.

शेतकरी सक्षमीकरणासह रोजगाराच्या संधी

रेशीम शेती हा अल्पभूधारक व सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी कमी कालावधीत उत्पन्न मिळवून देणारा



शेतीपूरक व्यवसाय मानला जातो. ग्लोबल विकास ट्रस्टच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमातून शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन, दर्जेदार तुती रोपांची उपलब्धता, रेशीम कीटक संगोपनाचे प्रशिक्षण तसेच उत्पादित कोशांना योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य मिळणार आहे.

यामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासोबतच शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला हातभार लागण्याची अपेक्षा आहे.समन्वय कराराची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश

बैठकीत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी संबंधित यंत्रणांना या प्रकल्पाची सविस्तर कार्ययोजना तयार करण्याचे निर्देश दिले. तसेच ग्लोबल विकास ट्रस्टसोबतचा समन्वय कराराची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून हा उपक्रम तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने आवश्यक नियोजन करण्याच्या सूचना दिल्या.रेशीम उद्योगाच्या माध्यमातून जिल्ह्यात रेशीम उत्पादक शेतकऱ्यांचा मजबूत गट निर्माण होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, असा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला.

# शहागड ग्रामपंचायतीच्या लेखापरीक्षणावर माहिती आयोगाचा दणका

## ऑडिटची माहिती दडवली का? राज्य माहिती आयोगाचे शहागड ग्रामपंचायतीला निर्देश

शहागड ।प्रतिनिधी

शहागड ग्रामपंचायतीच्या लेखापरीक्षणासंदर्भातील माहिती मिळविण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जानंतर प्रकरण थेट राज्य माहिती आयोगाच्या दारात पोहोचले. द्वितीय अपीलावर सुनावणी घेत राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी संबंधित माहिती उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिल्याने ग्रामपंचायतीच्या लेखापरीक्षणाशी संबंधित कागदपत्रे आता समोर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

ड. गणेश चंद्रकांत शिंदे यांनी शहागड ग्रामपंचायतीच्या लेखापरीक्षणासंदर्भात माहितीच्या अधिकाराखाली ०२ जानेवारी २०२६ रोजी माहिती अर्जानुसार मागितली होती. अपेक्षित माहिती वेळेत उपलब्ध न झाल्याने त्यांनी प्रथम अपील केले. त्यानंतरही समाधानकारक माहिती न मिळाल्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्यात आले.

या प्रकरणाची सुनावणी ०९ सप्टेंबर २०२६ रोजी झाली. सुनावणीदरम्यान मागविण्यात आलेली माहिती विस्तृत स्वरूपाची असून संबंधित अभिलेख उपलब्ध करून देण्याचा मुद्दा आयोगासमोर आला. त्यानंतर राज्य माहिती आयुक्त मकरंद रनडे यांनी आदेश देत पंचायत समिती अंबड येथील गटविकास अधिकारी तथा विस्तार अधिकारी यांना आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकृत केले.आयोगाच्या निर्देशानुसार अर्जदाराने चिन्हांकित केलेलीसी २० पृष्ठांपर्यंतची माहिती विनामूल्य उपलब्ध करून द्यावी. त्यापेक्षा अधिक माहिती आवश्यक असल्यास ती माहितीच्या अधिकार कायद्यातील नियमानुसार उपलब्ध करून देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

या आदेशामुळे शहागड ग्रामपंचायतीच्या लेखापरीक्षणाशी संबंधित माहिती नागरिकांसमोर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ग्रामपंचायतीच्या आर्थिक व प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता राहणे आणि नागरिकांना त्यांच्या मागणीनुसार अभिलेख उपलब्ध होणे, हा माहितीच्या अधिकाराचा मूलभूत उद्देश आहे.माहिती आयोगाच्या या आदेशामुळे शहागड ग्रामपंचायतीच्या लेखापरीक्षणासंदर्भात नेमकी कोणती माहिती समोर येते, याकडे आता शहागड ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.माहितीच्या अधिकारांतर्गत अर्ज करूनही जनमाहिती अधिकारी मागितलेली माहिती उपलब्ध करून देत नाहीत. उलट, अर्जदाराची हरासमेंट करण्याचा प्रयत्न संबंधित अधिकाऱ्यांकडून केला जात आहे. मात्र, आम्हाला न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास आहे. राज्य माहिती आयोगाच्या आदेशाप्रमाणे निर्धारित मुदतीत कार्यवाही न झाल्यास, आम्ही कायदेशीर मार्गाने पुढील लढाई लढू.

- ॲड. गणेश शिंदे
अपीलार्थी

# पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल येथे सेवा संकल्प अभियानातर्गत आपत्ती व्यवस्थापनाचे ५०० विद्यार्थ्यांना दिले प्रशिक्षण

## गटशिक्षणाधिकारी अजित तरवटे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

अर्धापूर (प्रतिनिधी) येथील पी एम.श्री जिल्हा परिषद हायस्कूलचे मुख्याध्यापक डॉ शेख एम डब्ल्यू एच यांच्या पुढाकाराने सेवा संकल्प अभियानातर्गत आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणास नव्याने रूजू झालेले गटशिक्षणाधिकारी अजित तरवटे यांनी 'पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल'ला भेट दिली. या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विशेषत्वाने आयोजित करण्यात आलेल्या सेवा संकल्प अभियानातर्गत 'आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाची' पाहणी केली आणि विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांमध्ये आपत्कालीन परिस्थितीचा धैर्याने सामना करण्याची क्षमता निर्माण व्हावी, या उद्देशाने या प्रशिक्षणाचे आयोजन



करण्यात आले होते. गटशिक्षणाधिकारी अजित तरवटे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, कोणत्याही नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीच्या वेळी गोंधळून न जाता, संयमाने आणि योग्य तंत्राचा वापर करून स्वतःचा व इतरांचा बचाव करणे अत्यंत महत्त्वाचे असते. शालेय वयात मिळालेले हे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण तुम्हाला भविष्यात एक सतर्क आणि जबाबदार नागरिक बनण्यास नक्कीच मदत करेल.

या प्रशिक्षण सत्रात तज्ज्ञ मार्गदर्शकांद्वारे विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची तत्काळ काळजी, प्रथमोपचार (ऋळीीं -ळव), आग विझवण्याचे प्राथमिक तंत्र आणि बचाव कार्याची (ठशीर्लीश जशिीर-ींळेपी) विविध प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. तरवटे यांनी विद्यार्थ्यांचा यातील उत्स्फूर्त सहभाग आणि शिकण्याची वृत्ती पाहून समाधान व्यक्त केले. पीएम श्री योजनेअंतर्गत शाळेत राबवण्यात येत असलेल्या अशा जीवनोपयोगी उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी मुख्याध्यापक डॉ शेख एम डब्ल्यू एच.,यांनी सेवा संकल्प अभियानातर्गत आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण सत्रास शिक्षण विस्तार अधिकारी निजाम शेख, विषय सहायक अब्दुल रझाक यांनी भेट देऊन माहिती घेतली सर्व शिक्षक वृंद, आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नूतन गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या या प्रेरक भेटीमुळे व मार्गदर्शनामुळे विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.

# दु:खाच्या काळात माणुसकीचा हात; रेडेवाड कुटुंबाला शिलाई मशीनची मदत



नायगाव वाडी येथील आत्महत्याग्रस्त राजेश आनंदा रेडेवाड (वय ३२) यांच्या कुटुंबावर आलेल्या संकटाच्या काळात 'नाम फाऊंडेशन'चे समन्वयक भा. ग. मोरे आणि नायगाव पंचायत समितीचे माजी सभापती सय्यद रहीम यांनी माणुसकीचा हात पुढे केला. कुटुंबाला आर्थिक मदतीपुरते मर्यादित न ठेवता त्यांना स्वावलंबी होण्यासाठी आधार मिळावा, या उद्देशाने शिलाई मशीन भेट देण्यात आली.

राजेश रेडेवाड यांच्या निधनामुळे कुटुंबावर मोठे संकट कोसळले आहे. या पार्श्वभूमीवर भा. ग. मोरे आणि सय्यद रहीम यांनी रेडेवाड कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. दुःखातून सावरण्याचे बळ देत परिस्थितीशी धैर्याने सामना करण्याचा सल्ला देण्यात आला. तसेच कुटुंबाच्या पाठीशी आपण ठामपणे उभे असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शिलाई मशीनच्या माध्यमातून कुटुंबातील सदस्याला रोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे आणि भविष्यात उदरनिर्वाहासाठी स्वावलंबी होता यावे, हा मदतीमागील उद्देश आहे. संकटग्रस्त कुटुंबाला केवळ तात्पुरती मदत न करता त्यांच्या पुनर्वसनाचा विचार करण्याची ही भूमिका समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

'नाम फाऊंडेशन'च्या माध्यमातून शेतकरी आत्महत्या, दुष्काळ आणि विविध संकटांमुळे अडचणीत आलेल्या कुटुंबांना मदतीचा हात देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. संकटग्रस्त कुटुंबांना पुन्हा उभे करण्याच्या या प्रयत्नातून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडत आहे.

दुःखाच्या प्रसंगी कुणीतरी आपल्या पाठीशी उभे आहे, ही भावना संकटग्रस्त कुटुंबासाठी मोठा आधार ठरते. भा. ग. मोरे आणि सय्यद रहीम यांनी केलेल्या या मदतीमुळे माणुसकीची जाणीव अधिक दृढ झाली असून, गरजू कुटुंबाच्या मदतीसाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढे यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# सोशल मीडियाचा वापर करताना विद्यार्थ्यांनी सतर्क राहावे

## सपोनि शहदेव खेडकर

### पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल तामसा येथे सायबर सुरक्षा व महिला सुरक्षेबाबत मार्गदर्शन

तामसा (प्रतिनिधी)

पोलीस स्टेशन तामसा यांच्या वतीने पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल, तामसा येथील विद्यार्थ्यांना सोशल मीडिया वापर, सायबर गुन्हेगारी तसेच महिला सुरक्षेबाबत जिल्हापोलीस अधीक्षक निलाभ रोहन यांच्या संकल्पतेतून मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सपोनि शहदेव खेडकर यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडियाचा काळजीपूर्वक व जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन केले. अनोळखी व्यक्तींकडून आलेल्या लिंकवर क्लिक करू नये, कोणालाही ओटीपी, पासवर्ड किंवा वैयक्तिक माहिती देऊ नये, तसेच संशयास्पद संदेश व ऑनलाइन व्यवहारांपासून सावध राहावे, असे त्यांनी सांगितले.

तसेच विद्यार्थिनींना 'गुड टच-बॅड टच', महिला सुरक्षेचे उपाय आणि अडचणीच्या प्रसंगी तातडीने मदत कशी घ्यावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० या सायबर हेल्पलाइन क्रमांकावर तक्रार नोंदवावी, तर आपत्कालीन परिस्थितीत ११२ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा, अशी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.या मार्गदर्शन कार्यक्रमास पोउपनि शेख रसूल, पोलीस कॉन्स्टेबल प्रकाश कबळे, पोलीस हेड कॉन्स्टेबल चक्रधर पवार यांच्यासह शाळेतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.